रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २१६
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, २२ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कुर्ला येथे छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे लोकार्पण/२

मुरूडमधील केंद्रातून १८ हजार क्विंटल भातखरेदी/५

राज्यस्तरीय गोशिन रियु कराटे स्पर्धेत विद्यार्थ्यांचे सुयश/८

## कल्याण रेल्वेस्थानकात स्फोटके; आरोपींचा शोध सुरू

**कल्याण** : कल्याण रेल्वे स्थानकातील फलाट क्र. १वर बुधवारी (दि.२१) सकाळी दोन



खोक्यांमध्ये भरलेली एकूण ५४ स्फोटके (डिटोनेटर्स) लोहमार्ग पोलिसांनी जप्त केली आहेत. पोलिसांनी रेल्वेस्थानक परिसरातील सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे आरोपींचा शोध सुरू केला आहे. कल्याण पश्चिम फलाट क्र. १वर दोन खोके आहेत, त्यात स्फोटकसदृश्य ज्वलनशील पदार्थ असल्याची माहिती एका सफाई कामगाराने लोहमार्ग पोलिसांना दिली. पोलिसांनी तातडीने रेल्वेस्थानकात सहकाऱ्यांसह धाव घेत खोक्यांची तपासणी करून ते ताब्यात घेतले. श्वान पथकाला पाचारण करण्यात आले. ही स्फोटके रेल्वेस्थानकात कोणत्या कारणासाठी आणली होती, ती कोणी आणून ठेवली, अशा विविध अंगांनी पोलिसांच्या विशेष पथकाने तपास सुरू केला आहे.

# हजारो कोटींचे ड्रग्ज जप्त

## पुणे, सांगलीत कारवाई; दिल्लीतही कनेक्शन

**पुणे : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांत पुण्यात पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थविरोधी पथकाने धडक कारवाई सुरू केली आहे. अवघ्या चार दिवसांत पुणे पोलिसांनी विविध ठिकाणी छापे टाकून जप्त केलेल्या मेफेड्रॉन या अमली पदार्थांची किमत तब्बल चार हजार कोटी रुपयांच्या घरात पोहचली आहे.

पुणे पोलिसांनी पकडलेल्या मेफेड्रॉनची एकत्रित रक्कम ही पुणे महापालिका अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या खर्चाइतकी ठरलीय. एखाद्या थ्रीलर चित्रपटाच्या कथानकाप्रमाणेच पुण्याच्या सोमवार पेठेतून समोर आलेले ड्रग्जचे कनेक्शन हे विश्रांतवाडी, कुरकुंभ एमआयडीसी, मुंबई, दिल्ली ते सांगली असे पसरले आहे. पुण्यातील सोमवारपेठेत मेफेड्रॉनच्या विक्रीसाठी एक ड्रग तस्कर येणार असल्याची माहिती पुणे पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचला आणि ड्रग्जची विक्री करताना वैभव माने, हैदर शेख आणि अजय कारोसिया यांना अटक केली. त्यांच्याकडून दोन कोटी रुपये किमतीचे एक किलो मेफेड्रॉन जप्त करण्यात आले. अटक केलेल्या तिघांच्या चौकशीतून पोलीस पुण्यातील विश्रांतवाडी भागात पोहचले आणि इथे मीठाच्या पॅकिंगमध्ये भरून ठेवण्यात आलेले तब्बल ११० कोटी रुपये किमतीचे मेफेड्रॉन आढळून आले.

विश्रांतवाडीत सापडलेले मेफेड्रॉन दौंड तालुक्यातील कुरकुंभ एमआयडीसीमधील अर्थकेम या केमिकल कंपनीत तयार झाल्याचे पोलिसांना समजले. या कंपनीवर छापा टाकला असता आणखी १२०० कोटी रुपयांचे मेफेड्रॉन पोलिसांनी जप्त केले आणि या कंपनीचा मालक अनिल साबळे याला अटक करण्यात आली.

अनिल साबळेच्या या कंपनीत मेफेड्रॉन तयार करण्याच काम करत होता युवराज भुजबळ नावाचा सायंटिस्ट. एमएसस्सी केमिस्ट्री असलेल्या या सायंटिस्टलादेखील मुंबईतून अटक करण्यात आली. कुरकुंभमधल्या या ड्रगच्या कारखान्यातून दिल्लीमध्ये मेफेड्रॉन पाठविण्यात आल्याचे समोर आल्यावर पुणे पोलीस दिल्लीत पोहचले. (पान २ वर..)



### सोलापूर पोलिसांकडून ५६४ किलो गांजा हस्तगत

**सोलापूर** : ग्रामीण पोलीस दलाने ओडिसा आणि आंध्रप्रदेश या राज्यातून महाराष्ट्रात गांजा तस्करी करणाऱ्या सहा आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून तब्बल ५६४ किलो इतका गांजा जप्त केला आहे. सोलापूर तालुका आणि टेंभुर्णी पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे एक कोटी ३६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ड्रग्स निर्मिती करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा मुख्य सुत्रधारला कर्नाटकातल्या कलबुर्गी येथून जेरबंद केले आहे तर, त्याच्या साथीदारास हैद्राबाद येथून अटक केली आहे. या प्रकरणी आतापर्यंत १३ आरोपींना अटक केली आहे.

### पुण्यातील ड्रग्ज व्हाया सांगली

पुणे पोलिसांनी बुधवारी (दि. २१) सांगलीत छापेमारी करीत १०० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले आहे.
पुणे पोलिसांनी सांगली जिल्ह्यातील कुपवाड येथील ड्रग्जसाठ्यावर छापेमारी केली. तेथे ५० किलो ड्रग्ज जप्त केले आहेत. पुण्यात तयार होणाऱ्या ड्रग्जचे थेट सांगली जिल्ह्यातील कुपवाड या ठिकाणी संबंध लागल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. अजूनही काही ठिकाणी तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. ड्रग्ज बनवणाऱ्या काही इंजिनिअर तरूणांना पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पुणे पोलिसांनी थेट दिल्लीतही कारवाई केली होती. या छापेमारीत त्यांनी ८०० कोटी रुपयांचे ४०० किलो एमडी जप्त केले होते. दिल्लीतही बुधवारी रोजी पुणे पोलिसांच्या आणखी एका कारवाईमध्ये १२०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे ६०० किलो एमडी जप्त केले आहे.

# खासदार शरद पवार गटाला हायकोर्टाची नोटीस

## ११ मार्चपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

खासदार शरद पवार गटातील १० आमदारांना अपात्र न ठरवण्याच्या विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात अजित पवार गटाने हायकोर्टात धाव घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतोद अनिल पाटील यांनी हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेची दखल घेत हायकोर्टाने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि खासदार शरद पवार गटातील १० आमदारांना नोटीस बजावत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रतोद अनिल पाटील यांनी शरद पवार गटातील १० आमदारांना अपात्र न करण्याच्या राहुल नार्वेकरांच्या निर्णयाला आव्हान देत जयंत पाटील आणि अनिल देशमुख यांच्याविरोधात



दोन स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. त्यावर बुधवारी (दि.२१) न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली.

हायकोर्टाने या याचिकेची दखल घेत राज्य विधिमंडळ सचिवालयासह अन्य सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली आहे. ज्यात ११ मार्चपर्यंत प्रतिज्ञपत्राद्वारे भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देत याचिकेवरील पुढील सुनावणी १४ मार्च रोजी घेण्याचे निश्चित केले आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी १५ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचाच असल्याचे आपल्या निकालात जाहीर केले. हे करतानाच दोन्ही गटाच्या आमदारांना पात्र ठरवले होते, मात्र पक्ष आमचा असेल तर त्यात दुसरा गट कसा तयार करता येईल? त्यांनी दुसऱ्या पक्षात विलिन व्हावे अन्यथा त्यांना आमचा व्हीप लागू होईल, अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार गटाकडून ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ मुकुल रोहतगी यांनी हायकोर्टात मांडली.

## किशन जावळे रायगडचे नवे जिल्हाधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू असून रायगड जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांची बदली झाली आहे. कोकण आयुक्त कार्यालयात अप्पर आयुक्तपदी कार्यरत असलेले किशन जावळे यांची रायगड जिल्हाधिकारीपदी नियुक्ती आली आहे.

अप्पर आयुक्त कोकण विभाग किशन जावळे यांची रायगड जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आल्याचे अप्पर मुख्य सचिव नितीन गद्रे यांनी सांगितले. मावळते जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांना अद्याप कोणत्याही ठिकाणी नियुक्ती दिलेली नाही.

## मराठा आरक्षण आंदोलनात फूट पडण्याची शक्यता

### मनोज जरांगे-पाटील आणि अजयमहाराज बारसकरांमध्ये वाक्‌युद्ध

**अंतरवाली सराटी : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा आरक्षण जाहीर केल्यानंतर दुसरीकडे मराठा संघटनेत फुट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मनोज जरांगे-पाटील यांचे सोबती अजयमहाराज बारसकर यांनी जरांगे यांच्यावर अनेक आरोप करीत टीका केली.

जरांगे यांनी संत तुकाराम महाराजांचा अपमान केला असा आरोप त्यांनी केला, तसेच मी पाणी पाजायला गेलो असताना त्यांनी संत-फिंत गेले खड्ड्यात असे वक्तव्य केल्याचेही त्यांनी सांगितले. मनोज जरांगे हे हेकेखोर असल्याचा आरोप अजयमहाराज बारसकर यांनी केला. मी जरांगेंच्या प्रत्येक कृतीला साक्षी आहे, मी प्रसिद्धीसाठी किंवा पैशासाठी काही करतोय मात्र बिलकुल नाही, असे सांगत अनेक दिवसांपासून आपल्या मनात खदखद असल्याचे त्यांनी सांगितले.

**अजयमहाराज बारसकर हा भोंदू : मनोज जरांगे-पाटील**

तुकाराम महाराजांच्या आडून समाजाचे वाटोळे करू नका. अजय महाराज बारस्कर हा भोंदू महाराज आहे, अशी टीका मनोज जरांगे-पाटील यांनी केली. अजयमहाराज बारस्कर यांची माफी मागणार नाही. मला पाणी पाजून त्याला मोठे व्हायचे होते. समाजाचे वाटोळे करू नका. या बाबाला उत्तरे देणार नाही, काय बोंबलायचे ते बोंबल, अन्यथा याला वेगळे वळण लागू शकते, असा इशारा त्यांनी दिला.

## निवडक

### सुप्रसिद्ध निवेदक अमीन सयानी यांचे निधन

**नवी दिल्ली** : शैलीदार आणि रसाळ निवेदनाने संगीतप्रेमींच्या गळ्यातील ताईत बनलेले ज्येष्ठ निवेदक अमीन सयानी यांचे मंगळवारी (दि.२०) रात्री रुग्णालयात निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. अमीन यांनी 'बहनों और भाईयो, अगली पायदानपें है ये गाना' असे म्हणत अनेक वर्षे रेडिओवर बिनाका गीतमाला सादर केली. हिंदी भाषेत निवेदन आणि गाण्यांचे किस्से ऐकवत बिनाका गीतमाला कार्यक्रम लोकप्रिय केला.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अपघातात दोघांचा मृत्यू

**पुणे** : मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर ओव्हरटेक करण्याच्या नादात बुधवारी (दि.२१) पहाटेच्या सुमारास एका कारचा भीषण अपघात झाला. अपघातामध्ये कारमधील दोघांचा मृत्यू झाला. मयुरी थोरात आणि सुनील थोरात अशी मृतांची नावे आहेत, तर अक्षय थोरात, दत्तात्रय थोरात, तेजल थोरात, श्रद्धा थोरात, आणि राजीव थोरात ही गंभीर जखमी झाले आहेत.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धा

## लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयाची तालुकास्तरावर बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेमध्ये पनवेल महापालिकेच्या लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयाने तालुकास्तरावर बाजी मारली आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमांतर्गत पनवेल विभागातील सुमारे २४० शाळांनी सहभाग घेतला होता. शिक्षण विभागाचे अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त गणेश शेटे व प्रशासन अधिकारी कीर्ती महाजन यांच्या सूचनेनूसार लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयामधील अनुपमा डामरे, सरिता काकडे, विनिता तायडे, वैशाली सावळे, वैशाली पाटील, चंद्रकांत वारगुडे, अर्चना माने, नीलम देवळे, जयश्री रोडे अशा सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली होती. स्पर्धेंतर्गत प्रधानमंत्री पोषण



शक्ती निर्माण योजनेच्या अनुषंगाने शाळेच्या आवारात परसबागेची निर्मिती करून त्याद्वारे आरोग्यदायी भाज्यांची लागवड करण्यात आली होती. शैक्षणिक गुणवत्ता व वैयक्तिक विकासासाठी वाचन चळवळ सुरू करण्यात आली आहे. विविध स्पर्धा, शाळा सुशोभीकरण, इतर कला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. (पान २ वर..)

## एकविरा आई तैलचित्र अनावरण आणि सेल्फी पॉईंट उद्‌घाटन समारंभ आज

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या निधीतून बांधण्यात आलेल्या पनवेल कोळीवाडा आई जरीमरी खुले सभा मंडपाचे लोकार्पण तसेच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या आई एकविरा मातेच्या तैलचित्राचे अनावरण आणि सेल्फी पॉईंटचा उद्‌घाटन सोहळा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२२)होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीताताई पाटील, माजी नगरसेवक राजू सोनी, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, अब्दुल मुकीत काझी, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, रुचिता लोंढे आदी उपस्थित राहणार आहेत.

## रायगड जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेला ४९ केंद्रांवर शांततेत सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यर्थ्यांच्या करिअरमधील एक महत्त्वाचा टप्पा असलेली बारावीची परीक्षा आजपासून सुरू झाली आहे. रायगड जिल्ह्यातून या परीक्षेसाठी ३१ हजार ९४३ विद्यार्थी बसणार असून त्यांच्यासाठी ४९ परीक्षा केंद्रांवर सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

परीक्षेमध्ये कॉपीसारखा कोणताही गैरप्रकार होऊ नये म्हणून शिक्षण विभागाने पाच भरारी पथके नेमली आहेत. परीक्षा केंद्राच्या ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त असणार आहे. परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी परीक्षा केंद्र परिसरात तसेच परिरक्षक कार्यालय परिसरात कलम १४४ लागू करण्याचे आदेश पोलीस प्रशासनाकडून देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे यांनी दिली.

राज्यात परीक्षा कालावधीत कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश वरिष्ठ स्तरावरून दिले आहेत. परीक्षा काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी, गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने परीक्षा केंद्र परिसरातील १०० मीटर परिसरात जमावबंदीचे आदेश दिले आहेत. परीक्षार्थी, शिक्षणाधिकारी व शिक्षकांव्यतिरिक्त इतरांना प्रवेशास प्रतिबंध केली आहे.

याशिवाय केंद्राच्या १०० मिटर परिसरात एसटीडी बूथ, झेरॉक्स, फॅक्स केंद्र बंद राहणार आहे. परीक्षा केंद्रावर डिजिटल डायरी, मोबाईल, मायक्रोफोन, स्मार्टवॉच, वायरलेस या वस्तू नेण्यासाठी बंदी घातली आहे. हा आदेश २६ मार्चपर्यंत लागू राहील.

### पाच भरारी पथके

कॉपी किंवा परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी माध्यमिक शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी यांची पथके संपूर्ण जिल्ह्यात दौरे करणार आहे. ही पथके प्रत्येक परीक्षा केंद्रावर जाऊन वस्तूस्थितीची पाहणी करणार असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे, तर शिक्षणाधिकारी (योजना) यांचे एक बैठे पथक असणार असून या परीक्षा प्रक्रियेवर लक्ष ठेवणार आहे.

## राज्यातील १०० महाविद्यालयांमध्ये ४ मार्चपासून कौशल्य विकास केंद्र

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाच्या धर्तीवर राज्यातील १०० महाविद्यालयांमध्ये ४ मार्चपासून कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात येणार असून कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक-युवतींनी घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी यांनी केले.

एल्फिन्स्टंट तांत्रिक विद्यालय येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आयोजित महाविद्यालयांकरिता कौशल्य विकास कार्यशाळेत आयुक्त चौधरी बोलत होत्या. या वेळी राज्य कौशल्य विकास सोसायटीचे अत्तिरिक आयुक्त अनिल सोनवणे, राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळाचे अधिकारी गौरव दिमान यांसह विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

आयुक्त निधी चौधरी म्हणाल्या की, कौशल्य विकास या संकल्पनेचा लाभ व्हावा यासाठी राज्यातील तीन हजार पाचशेहून जास्त महाविद्यालयाकडून कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याबाबत माहिती मागविण्यात आलेली आहे. कार्यशाळेतून कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रांची नोंदणी, कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी सुसंगत अभ्यासक्रम निवडणे, महास्वयंम्‌ पोर्टलवर माहिती भरणे यासह सर्व माहिती या प्रशिक्षणामध्ये दिली जाईल. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते ऑन जॉब ट्रेनिंगपर्यंत कौशल्य विकास विभागाने एक आदर्श कार्यपद्धती तयार केली आहे. जास्तीत जास्त महाविद्यालयाने कौशल्य विकास केंद्र सुरू करणे या योजनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन चौधरी यांनी केले.

## सीकेटी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

### स्व. जनार्दन भगत यांच्या जयंतीचे औचित्य





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि सर जे. जे. रुग्णालय मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तथा स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या ९६व्या जयंतीनिमित्त सीकेटी महाविद्यालयाच्या एनएसएस विभागाने रक्तदान शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.२१)करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या शिबिराला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला असून १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या वेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. डी. एस. नारखेडे, एनएसएस विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. एन. परकाळे, वरिष्ठ महिला कार्यक्रम अधिकारी आणि शिबिराच्या समन्वयक डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. राहुल पाटील, प्रा. आलोक भानुशाली, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली पाटील, एनएसएस विषय शिक्षक प्रा. रुपेश माने यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## राज्य बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष पंढरीनाथ फडके यांचे निधन

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष पंढरीनाथ फडके यांचे हृदयविकाराच्या झटक्याने बुधवारी (दि.२१) निधन झाले. पनवेल तालुक्यातील विहीघरमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने महाराष्ट्र राज्य बैलगाडा संघटनेवर तसेच फडके कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

पंढरीनाथ फडके संपूर्ण महाराष्ट्रात बैलगाडा शर्यतीसाठी प्रसिद्ध होते. १९९६पासून वडिलांमुळे पंढरीनाथ फडकेंना बैलगाडीची आवड निर्माण झाली. तिथपासून सुरू झालेली आवड फडकेंनी जपली होती. आत्तापर्यंत ४० ते ५० शर्यतींची बैल त्यांनी राखून ठेवली होती. कोणत्याही शर्यतीमध्ये एक नंबरला असलेला बैल पळायला



लागला की, त्याच्यावर पंढरीशेठ यांची नजर असायची. त्यानंतर त्याची कितीही किंमत असली तरी ते विकत घ्यायचे. त्यांच्याकडे महाराष्ट्रातील टॉपचा समजला जाणारा बादल बैल याने तब्बल ११ लाख रुपयांची शर्यत जिंकली होती.

पंढरीनाथ फडके हे पनवेल परिसरात गोल्डन मॅन म्हणून ओळखले जायचे. अडल्या नडल्यांना मदत करणे ही त्यांची आवड होती. त्यामुळे अनेकांचा पोशिंदा गेल्याचे दुःख पनवेल तालुक्यातून व्यक्त करण्यात येत आहे.

# मालमत्ता कर जप्ती 'मजबूत'

## ▪ पनवेल मनपाकडून कर्मचाऱ्यांमध्ये वाढ
## ▪ थकबाकीदारांच्या विरोधात लवकरच कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेचा मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांच्या विरोधात महापालिका लवकरच कारवाईस सुरूवात करणार आहे. यासाठी महापालिकेने आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचाऱ्यामध्ये वाढ केली आहे.



महानगरपालिका क्षेत्रातील चारही प्रभागामधील सुमारे ३ लाख ५० हजार मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आली आहे. यातील ७७ हजार मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ताकर भरला आहे. उर्वरित दोन लाख ८० हजार मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला नाही. आज दिनांक २१ फेब्रुवारी अखेर एकुण ५४५ कोटीची वसुली महापालिकेने केली आहे. तसेच सध्याच्या आर्थिक वर्षामध्ये १७ एप्रिल पासून आजपर्यंत २५८ कोटी इतकी वसुली झाली आहे.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतू आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांचा खूप जास्त मालमत्ता कर भरावयाचा राहीला अशा सुमारे १०१ औद्योगिक, १०७ अनिवासी, १००निवासी थकबाकीदारांची यादी आज १० दैनिकांमध्ये प्रसिध्द केली आहे. या मालमत्ताधारकांना जप्ती नोटीसा देण्याचे काम वेगाने सुरू आहे. त्यानंतर येत्या काही दिवसांमध्ये महापालिकेच्या चारही प्रभाग अधिकाऱ्यांच्या माफत वॉरंट काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ व अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७ अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकी पोटी जंगम स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करुन जाहिर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करणेची तरतूद महापालिकेस आहे. मालमत्ता धारकांनी महापालिकेचा मालमत्ता कर भरावा यासाठी महापालिकेने सातत्याने विविध सवलती दिल्या होत्या.अखेर मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेने मालमत्ताधारकांना वसुलीच्या नोटीस दिल्यानंतर आता जप्ती नोटीसा देण्यास सुरूवात केली आहे.यासाठी मालमत्ता कर विभागाच्या जप्ती पथकाच्या कर्मचाऱ्यामध्ये वाढ करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून निवासी, अनिवासी, औद्योगिक थकीत मालमत्ताधारकांना जप्ती नोटीसा पाठविण्याचे काम सुरू झाले आहे.

'थकीत मालमत्ता कराच्या कारवाई अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानूसार सदर मालमत्ता जप्त करण्यात आली आहे, तसेच सदर मालमत्ता विक्री व खरेदीस प्रतिबंध असल्याने विक्री खरेदी व्यवहार करता येणार नाही' अशा आशयाचे महापालिकेने विशेष स्टिकर्स छापले असून, जास्त थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांच्या मालमत्तांवरती हे विशेष स्टिकर्स जप्ती कर्मचाऱ्याच्या माध्यमातून लावले जात आहे.

महापालिका महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन सातत्याने रिक्षामधून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून चारही प्रभागांमध्ये केले जात आहे. महापालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल प विकसित केले आहे. तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# कुर्ला येथील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे लोकार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वगुणसंपन्न राजे होते. त्यांच्या प्रेरणेतून आणि त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसारच शासन काम करत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कुर्ला पश्चिम येथील संत गाडगे महाराज विद्यालय येथे उभारण्यात आलेल्या मुंबईतील पहिल्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या वेळी खासदार पूनम महाजन, आमदार ॲड. आशीष शेलार, आमदार पराग आळवणी, संत गाडगे महाराज संस्थेचे अध्यक्ष प्रकाश उर्फ भाऊ चौधरी उपस्थित होते. मुंबईतील पहिल्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचे उद्घाटन करणे हा माझ्यासाठी भाग्याचा क्षण असून महाराजांसमोर नतमस्तक होण्याचे सौभाग्य लाभल्याचे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रभू श्री रामाप्रमाणेच समाजातील सर्व घटकांना एकत्र करण्याचे काम केले. सर्व समाजातील लोकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये लढण्याची प्रेरणा निर्माण केली. गुलामगिरीच्या विरुद्ध लढा उभारला. माँ जिजाऊ साहेबांनी दिलेल्या शिकवणीतून त्यांनी स्वराज्याची निर्मिती केली. माता –भगिनींचे रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराजांची अर्थनीती, राजनीती, परराष्ट्रनिती याचा अभ्यास जगभरात केला जातो. त्यांनी पर्यावरण संरक्षणाचे काम कसे करावे हा पाठ शिकवला, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महिला सन्मान आणि महिला सुरक्षा या विषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काम करत आहेत. २०४७ पर्यंत भारत विकसित देश बनवण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतूनच सुरू आहे. देशाची पुढील हजार वर्षांची वाटचाल कशी असावी याचा वस्तुपाठच महाराजांनी दिला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वाभिमान, तेज यातूनच नव भारत निर्मितीचे काम करत असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती करण्यात आली.



## निवडक

### कंटेनरच्या अपघातात वृद्ध जखमी

**पनवेल :** कंटेनरने दिलेल्या धडकेत ७४ वर्षीय रामचंद्र पाटील हे जखमी झाले आहेत. पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.रामचंद्र पाटील हे कोन येथे राहत असून कोन बस स्टॉप येथे कलिंगड आणण्यासाठी पायी गेले होते. पनवेल खोपोली हायवे रस्ता ओलांडायचा असल्याने ते काही माणसांसोबत रस्ता ओलांडत असताना कंटेनर भरधाव वेगाने आला आणि त्यांच्या उजव्या पायाला धडक दिली यात ते जखमी झाले. त्यानंतर कंटेनर चालक अपघाताची माहिती न देता निघून गेला.

### अत्रे कट्ट्यावर रविवारी व्याख्यान

**पनवेल :** दशकपूर्ती वर्षानिमित्त नवीन पनवेलच्या आचार्य अत्रे कट्ट्यावर माजी मुख्याध्यापिका, सुप्रसिद्ध लेखिका मंगला कुलकर्णी यांचे चला जगूया आनंदे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानाचे रविवारी (दि. २५) सायंकाळी ५.३० वाजता नवीन पनवेलच्या सिडको उद्यान, अरुणोदय हॉस्पिटल समोर येथे विनामूल्य आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अत्रे कट्ट्याचे अरविंद करपे यांनी केले आहे.

### महिलेचे दोन लाख रुपये लंपास

**पनवेल :** एका महिलेकडे असलेली दोन लाखांची रक्कम लंपास केल्याची घटना तळोजा परिसरात घडली आहे. तळोजा सेक्टर ११ येथील ३२ वर्षीय फायका मालगुंदकर ह्या स्टेट बँक ऑफ इंडिया येथे पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यांनी खात्यावरून दोन लाख रुपये काढले व ते पैसे प्लास्टिकच्या थैलीमध्ये ठेवले. त्यानंतर त्या बँकेच्या बाहेर पडल्यावर पायी चालत घराकडे निघाल्या यावेळी त्या तळोजा रस्त्याने पायी चालत घराकडे जात असताना दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या हातातील पैसे असलेली थैली खेचून ते पळून गेले. याप्रकरणी तळोजा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# खोपोलीमध्ये दोन घरफोड्या
## लाखोंचे दागिने, रोख रक्कम चोरीला

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेच्या बाजूला असलेल्या माऊंट व्ह्यू सोसायटीमधील दोन फ्लॅटमधून भर दिवसा चोरट्यांनी लाखो रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्यामुळे शहरात खळबळ मारली आहे. सायंकाळच्या वेळेस झालेल्या घटनेने खोपोलीत खळबळ उडाली आहे. इव्हनिंग वॉकला फ्लॅटला लॉक लावून गेले, त्या संधीचा अज्ञात चोरट्याने फायदा घेत डल्ला मारला.

याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार माऊंट व्ह्यू सोसायटीमधील महेंद्र ढमाले यांच्या घरून दोन लाखांची दागिने व मनीषा प्रकाश मोहिते यांच्या घरातून पाच लाख रुपयांचे दागिने व एक लाख रुपये रोख असा सहा लाखांचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. या दोन्ही कुटुंबातील लोक हे सायंकाळी पाच वाजता घर बंद करून फेरफटका मारण्यासाठी बाहेर गेले होते. भर दिवसा झालेल्या या घरफोडीमुळे शहरामध्ये खळबळ माजली आहे. घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज हाती आले असून पोलिसांचे पथक चोरट्यांचा शोध घेत आहेत.

पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुधाकर दिन लहाने व पथक पुढील तपास करीत आहेत

# पनवेलमध्ये शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

भाजप प्रदेश महासचिव व माजी उपमहापौर पनवेल विक्रांत बाळासाहेब पाटील यांच्या जनसेवा कार्यालया समोर छत्रपती शिवाजी महाराज शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात झाला.

यंदाचे २०२४ हे वर्ष शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ३५० वे वर्ष असल्याने यावर्षी शिवराज्याभिषेक मिरवणूक सोहळ्याचा सुंदर असा चलचित्र देखावा साकारण्यात आला होता. याच बरोबर किल्ले रायगडावरून आणलेली शिवज्योत आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची सुंदर आणि सुबक अशी मूर्ती पनवेलकरांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. शिवराज्याभिषेक सोहळा मिरवणुक चलचित्र देखाव्याचा उदघाटन करण्यात आले. रात्री तलवारबाजीमध्ये राष्ट्रीय पदक विजेती दिव्या पाटील हिने तलवारबाजीचे प्रात्यक्षिक दाखवून कार्यक्रमास आलेल्या सर्व नागरिकांची मनं जिंकली व शाबासकी मिळवली.



छत्रपती शिवाजी महाराज यांना श्री शिव सह्याद्री ढोल ताशा पथक पनवेलच्या वतीने मानवंदना देण्यात आली. या वेळी कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील आणि युवा महाराष्ट्र प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# उरणमध्ये मोफत आरोग्य शिबिर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील ज्येष्ठ नागरीक मंडल मुलेखंड, तेलीपाडा, कोलीवाडा, कुंभारवाडा अणि परिसर लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी, उरण व अपोलो रुग्णालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १९) फेब्रुवारी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत जेष्ठ नागरिक विरंगुला केंद्र मुलेखंड फाटा उरण करंजा रोड येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.



सुमारे १२२ नागरिकांनी तपासणी करुन घेतली. यंदाचे हे दुसरे शिबिर होते. करंजा ग्रामपंचायत सरपंच अजय म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात डोळे तपासणी, मधुमेह, रक्तदाब, इ.सी.जी बी.एम्.डी.(हाडांची घनता) आदी तपासणी करण्यात आली.

या वेळी करंजा ग्रामपंचायत सरपंच अजय म्हात्रे, ज्येष्ठ नागरीक मंडल अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत पाटील, उपाध्यक्ष अंकुश म्हात्रे, सचिव परशुराम पाटील, खजिनदार ईश्वर म्हात्रे, सर्व पदाधिकारी सदस्य, लायन्स क्लब ऑफ द्रोणागिरी अध्यक्षा सीमा घरत, सेक्रेटरी मोनिका चौकर, ॲड. दत्तात्रेय नवाले, संदीप म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्या उज्वला म्हात्रे, सदस्या पुष्पा म्हात्रे, अपोली रुग्णालय नवी मुंबईच्या शामला व टीम तसेच नागरिक आदी उपस्थित होते.

# अपघातील मयत जैन महिलेवर अंत्यसंस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

खोपोलीहून कर्जतला आलेल्या चार जैन साध्वी व त्यांच्याबरोबर असलेल्या जैन महिला कर्जतहून नेरळकडे जात असताना मागून येणाऱ्या सुसाट दुधाच्या टेंपोने तिघींना चिरडले होते. यामध्ये एक जैन साध्वी व एक जैन महिलेचा जागीच मृत्यू झाला तर एक भगिनी गंभीर जखमी झाली होती. जखमी झालेल्या जैन महिलेला पुढील उपचारासाठी पनवेलकडे नेण्यात आले होते. त्या महिलेचा मंगळवारी मृत्यू झाला होता. त्या महिलेवर बुधवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

दुधाच्या टेंपोने धडक दिलेल्या दीपा उर्फ दिवाली राणावत – ओसवाल यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावरसुध्दा जैन धर्मशाळेत धार्मिक विधी करण्यात आले पालखीतून मिरवणूक काढून कर्जत स्मशान भूमिमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हापूस आंबा थेट विक्रीसाठी नोंदणीला सुरुवात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत हापूस आंबा थेट विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करण्याचे दृष्टीने उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपक्रम राबविला जातो. आंबा हंगाम २०२४ करीता आंबा उत्पादकांना आंबा विक्री करीता पुणे आणि राज्यातील/परराज्यातील इतर शहरांमध्ये स्टॉल उपलब्ध होण्या करीता आंबा उत्पादकांची नोंदणी १५ फेब्रुवारी २०२४ पासून सुरू करण्यात आली आहे.

स्टॉल नोंदणी करीता आंबा नोंदीसह विविध प्रमाणपत्र प्रत, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे नावे १०,००० रुपये अनामत रक्कमेचा धनाकर्ष तसेच विहीत नमुन्यातील अर्ज व हमीपत्र इ. कागदपत्रे नोंदणीसाठी आवश्यक आहेत.

इच्छुक आंबा बागायतदारांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती रत्नागिरी आवार, शांतीनगर, नाचणे, जि.रत्नागिरी (०२३५२-२९९३२८) अथवा कृषी व्यवसाय पणन तज्ञ पवन बेर्डे, (७२१८३५००५४) यांचेशी संपर्क साधून नांव नोंदणी करावी, असे आवाहन कृषी पणन मंडळाचे वतीने करण्यात येत आहे.

## पान १ वरुन

पान १ वरुन

### हजारो कोटींचे ड्रग्ज जप्त

त्यानंतर दिल्लीतील दोन ठिकाणाहून १४०० कोटी रुपयांचे मेफेड्रॉन जप्त करण्यात आले. याच माहितीच्या आधारे सांगलीमध्येदेखील छापेमारी करून मेफेड्रॉन जप्त करण्यात आले.

याबाबत पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार पत्रकार परिषद घेत म्हणाले की, पुणे शहर आणि ग्रामीण भागात आत्तापर्यंत ७१७ किलो आणि दिल्लीत ९७० किलो असे एकूण १७०० ड्रग्स जप्त करण्यात आले आहे, तर सर्व कारवायांमध्ये एकूण आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे, तसेच आता दिल्लीनंतर सांगली जिल्ह्यात शोध मोहीम सुरू आहे. पुण्याच्या बाहेर गुन्हे शाखेची १५ पथके रवाना झाली आहेत. काही अमली पदार्थ कुरिअरमार्फत लंडनलादेखील गेले आहेत. त्यानुसार तपासदेखील सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयाची तालुकास्तरावर बाजी

याचबरोबरीने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकरिता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भविष्यात करीअर घडविण्यासाठी विशिष्ट कौशल्यावर आधारित तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजनही यादरम्यान करण्यात आले होते.

पाच एकर भूखंडावर तीन मजली इमारतीसाठी पनवेल महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदशनाखाली १२ कोटी रुपये खर्च करून ही शाळा बांधण्यात आली आहे. याठिकाणी इ. पहिली ते सातवी मराठी व इंग्रजी माध्यमाचे ज्युनिअर केजी व सिनीअर केजीचे वर्ग चालविले जातात.

# 'लोकसभा निवडणुक पूर्वपीठिका सुलभ संदर्भासाठी उपयुक्त'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोकण विभागाने प्रकाशित केलेल्या लोकसभा निवडणुक पूर्वपीठिका २०२४ पत्रकारांसाठी संदर्भ म्हणून उपयोगात येईल, असा विश्वास कोकण विभागचे विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी व्यक्त केला.



बुधवारी (दि. २१) महसूल आयुक्त कार्यालयात डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तिकेत लोकसभा निवडणूक १९८९ ते २०१९ पर्यंतचा ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या लोकसभा मतदारसंघांच्या मतांची आकडेवारी देण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाने निवडणूक आचारसंहिता आणि मार्गदर्शकतत्वे, निवडणूक आचारसंहिता काळात काय करावे, काय करू नये. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचारसंहिता याशिवाय वृत्तपत्रांसाठी मार्गदर्शक तत्वे, मतदान यंत्रांची माहिती आणि पेडन्यूज याशिवाय निवडणूक आचारसंहितेची माहिती देण्यात आली आहे.

ही पूर्वपीठिका विभागीय माहिती कार्यालय कोकणभवन कार्यालयाने संकलित केली असून, उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी संपादित केली आहे. तर सहाय्यक संचालक संजीवनी जाधव-पाटील आणि उपसंपादक प्रवीण डोंगरदिवे यांनी या पूर्वपिठीकेसाठी संपादन सहाय्य केले आहे. या छोटेखानी प्रकाशन समारंभावेळी, पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड, उपायुक्त (विकास) गिरीश भालेराव, विभागीय निवडणूक अधिकारी अजित साखरे आदी उपस्थित होते.

# टास्कच्या बहाण्याने सायबर ‘लूट’

## नवीन पनवेलमध्ये महिलेला सव्वाबारा लाखांचा ऑनलाईन गंडा

**पनवेल : वार्ताहर**

पार्टटाईम जॉब देण्याच्या बहाण्याने एका सायबर टोळीने नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका महिलेला टास्क पूर्ण करण्याच्या बहाण्याने तब्बल १२ लाख १६ हजार ४०० रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडून तिची ऑनलाईन फसवणूक केल्याचे उघडकीस आले.



नवी मुंबई सायबर पोलिसांनी या सायबर टोळी विरोधात फसवणुकीसह आयटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करून या टोळीचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणात फसवणूक झालेली ३० वर्षीय महिला नवीन पनवेल भागात राहण्यास असून, गत ५ जानेवारी रोजी एका सायबर टोळीने या महिलेच्या व्हॉट्सअपवर पार्टटाईम जॉबबाबत मेसेज पाठवला होता. या महिलेने पार्टटाईम जॉब करण्यास इच्छुक असल्याचे सांगितल्यानंतर सायबर टोळीने या महिलेला दोन लिंक पाठवून देत दोन रेस्टॉरंटला रेटिंग करण्याचा जॉब दिला. या महिलेने सदर हॉटेलचे रेटिंग करून सायबर चोरट्यांना स्क्रिनशॉट्स पाठवून दिल्यानंतर सायबर चोरट्यांनी तिला टेलिग्रॅम अप डाऊनलोड करण्यास सांगितले.

या महिलेने टेलिग्राम डाऊनलोड केल्यानंतर सायबर टोळीने तिच्याकडून टेलिग्रामद्वारे वैयक्तिक माहिती व बँक खात्याची माहिती मागून घेतली. तिला पुढील टास्क पूर्ण करण्यासाठी एका लिंकद्वारे टेलिग्रामच्या ग्रुपवर जॉइन करण्यात आले. त्यानंतर पहिला टास्क पूर्ण केल्यानंतर सायबर टोळीने तिच्या बँक खात्यावर १५० रुपये पाठवून दिले. तसेच अशा पद्धतीने एकूण २२ टास्क पूर्ण करावे लागतील, असे आले.

यानंतर या महिलेने २२ टास्कपैकी ७ टास्क पूर्ण केल्यानंतर तिला सर्व २२ टास्क पूर्ण करावे लागतील, असे सांगण्यात आले. त्यानंतर या महिलेला पुढील टास्क पूर्ण करण्यासाठी १ हजार रपये रक्कम पाठवण्यास सांगण्यात आले. रक्कम पाठवल्यानंतर या महिलेच्या खात्यात १३०० रुपये पाठवून सायबर टोळीने तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर पुढील टास्क पूर्ण करण्यासाठी तिला आणखी तीन हजार रुपये पाठवण्यास सांगण्यात आले असता, सदर रक्कमसुद्धा या महिलेने पाठवून दिली. अशा पद्धतीने या टोळीने टास्क पूर्ण करण्याच बहाण्याने या महिलेला वेगवेगळी रक्कम पाठवण्यास सांगून तिला होणारा नफा दर्शवून वेगवेगळ्या बँक खात्यावर पैसे पाठवण्यास भाग पाडले.

अशा पद्धतीने या महिलेने १२ लाख १६ हजार ४०० रुपये रक्कम पाठवल्यानंतर या महिलेला नफा म्हणून २९ लाख रुपये मिळणार असे दाखवण्यात आले. त्यानंतर या महिलेने २९ लाख रुपये मिळण्याकरीता सायबर टोळीला विनंती केली असता, त्यांनी सदर रक्कम मिळवण्यासाठी पुन्हा टास्क पूर्ण करावे लागतील, असे सांगितले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे या महिलेला लक्षात आले. त्यानंतर तिने प्रथम एनसीसीआरपी पोर्टलवर ऑनलाईन तक्रार दाखल करून नवी मुंबई पोलीस सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वारदोलीच्या उपसरपंचपदी अर्पिता पवार बिनविरोध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वारदोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अर्पिता अनंता पवार यांची बुधवारी (दि. २१) बिनविरोध निवड झाली. दरम्यान, उपसरपंचपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

वारदोली ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपरपंचपदाची निडवणुक बुधवारी पार पडली. या निवडणुकीसाठी अर्पिता अनंता पवार यांच्या विरुद्ध कोणताही उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने त्या उपसरपंचपदी बिनविरोध विराजमान झाल्या.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, भुपेंद्र पाटील, योगेश लहाने, सरपंच राम भवर, माजी सरपंच भरत पाटील, संजय गायकर, संगीता भूतांबरा, माजी उसरपंच सतीष पाटील, हेमंत तांडेल, सविता पाटील, जितेंद्र बताले, ग्रामपंचायत सदस्य दिनेश पाटील, अनंता पवार, बच्चू पवार, बाळा पवार, रामदास टोपरे, गोपाळ पाटील, दत्ता पाटील, संदीप मगर, विष्णू पवार, अतीश मालुसरे, योगेश पाटील, तेजस पाटील, हेमंत पवार, अजय पाटील, लक्ष्मण पाटील, शुभम पाटील, संतोष पाटील, मयुर नाईक, देवेश फडके, महादेव पवार, बुधाजी पवार, रमेश पवार, देवेश पवार, निलेश पवार, नारायण म्हात्रे, नरेश पवार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# सिमेंटचा अपहार करणारे ताब्यात



**पनवेल :** दोन लाख ८२ हजार ३२२ रुपये किंमतीच्या ३२.९२० टन सिमेंटचा अपहार करणाऱ्या दोघा जणांना पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून अपहार केलेला मुद्देमाल हस्तगत केला आहे.

तालुक्यातील नवकार लॉजिस्टीक कंपनी कोन गाव पनवेल ते अमित इन्फ्रा लॉजिक इंडिया प्रा.लि. तुर्भेदरम्यान आरोपी संदीपकुमार सरोज (२८ रा.रायबरेली) व त्याचा सहकारी भिमाशंकर पुजारी (२७ रा.चेंबुर) तसेच इतर तीन आरोपी यांनी आपसात संगनमत करून त्यांच्या ताब्यात दिलेला दोन लाख ८२ हजार ३२२ रुपये किंमतीच्या ३२.९२० टन सिमेंटचा माल हा इच्छितस्थळी न पोहोचविता तो ट्रकमधून काढून घेऊन त्याची विक्री करून स्वतः च्या फायद्याकरिता मालाचा अपहार केल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात केली. त्यानुसार वपोनि अनिल पाटील व गुन्हे पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय गळवे, हवालदार विजय देवरे, महेश धुमाळ, सुनील कुदळे, शिपाई आकाश भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे शोध घेतला.

आरोपी हे उत्तरप्रदेश येथील जगतपूर, रायबरेली या ठिकाणी जावून लपल्याचे माहिती मिळताच या पथकाने तात्काळ जगतपूर पोलीस ठाणे यांची मदत घेवून या ठिकाणी सापळा रचून या आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडून गुन्ह्यातील माल हस्तगत केला आहे.

# मृतदेह आढळला

**उरण :** जेएनपीटी रोड, पीयुबी ता. उरण येथे सोमवारी (दि. १२) अनोळखी पुरुष मयत व्यक्ती आढळला असून न्हावा शेवा पोलीस ठाणे या व्यक्तीच्या नातेवाईकांचा तपास करीत आहे. न्हावा शेवा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मयत व्यक्तीचे वय अंदाजे ५० वर्षे ते ५५ वर्षे असावे, अंगात सफेद शर्ट व निळी फुल पॅट आहे. उंची पाच फुट पाच इंच, रंग गोरा, बांधा किरकोळ, डोक्याचे केस वाढलेले, दाढी मिश्या वाढलेल्या, डोळे बंद, तोंड बंद,मान डाव्या बाजूस वळलेली अश्या मयताच्या नातेवाईकांचा न्हावाशेवा पोलीस ठाणे तपास करीत आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक संजय मोहिते तपास करीत आहेत. अधिक माहितीसाठी ०२२-२७२२४२८२, ०२२-२७४७१०१२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सुसंस्कृत भारत घडविण्यासाठी शिवजयंती साजरी करणे आवश्यक -आमदार प्रशांत ठाकूर

## नवीन पनवेलमध्ये विविध उद्घाटन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल पूर्व सेक्टर ६ मधील जी सी अस्पिरा २०६ सोसायटीचा संकुलात छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण तसेच सोसायटी कार्यालय व वाचनालय यांचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. सुसंस्कृत भारत घडविण्यासाठी शिवजयंती साजरी करणे आवश्यक असल्याचे मत आमदार प्रशांत ठाकूर यांनी या ठिकाणी मांडले.





आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतेवेळी २६ जानेवारी व १५ ऑगस्टप्रमाणे शिवजयंती ही प्रत्येक सोसायटीत उत्साहात साजरी झाली पाहिजे, असे प्रतिपादन केले तसेच वाचन संस्कृतीचे जतन करण्यासाठी वाचनालय फार महत्त्वाची आहेत व सोसायटीच्या आवारात वाचनालय सुरू केल्याबद्दल सोसायटीच्या समितीचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. या वेळी स्वरगंध कलावृंद यांनी पोवाडे व भक्तिगीतांचा कार्यक्रम सदर केला तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रावर प्रेरणादायी अस व्याख्यान व्याख्याते राजेंद्र घाडगे, सातारा, यांनी सादर दिले. सोसायटीतील मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमात महिलांचा सहभाग उल्लेखनीय होता. सर्व पुरुष व महिला पारंपारिक वेशात सहभागी झाले होते.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल अस्पिरा सोसायटीचे अध्यक्ष बळीराम साबळे, सचिव विशाल टोपकर, कोषाध्यक्ष श्री डी.के. सिंग आणि सांस्कृतिक समितीचे संयोजक प्रशांत खांदवे तसेच साई सितारा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष अजितकुमार कुलकर्णी, सचिव अरविंद मोरे, त्यांच्या पत्नी प्रा.डॉ. नीलिमा अरविंद मोरे इतर सहकारी आदी उपस्थित होते.

या वेळी अरविंद मोरे यांनी वाचनालयास शिवाजी कोण होता आणि स्वयंलिखित कुतूहलाचा करिश्मा ही पुस्तके भेट दिलीत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत खांदवे यांनी केले तर आभार सुरेश खरात यांनी मानले.

# सीकेटी महाविद्यालयात इतिहास विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभाग आणि आय.क्यू. ए. सी. यांनी संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत शुक्रवारी (दि. २३) सामाजिक शास्त्रे, मानव्यविद्या आणि शिक्षण क्षेत्रातील नवीन प्रवाह (Recent Ternds in Social Science, Humanities and Education) याविषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी मॉरिशियस विद्यापीठातील समाजशास्त्रज्ञप्रो. राजेन सुंटू, पुत्र मलेशिया विद्यापीठातील इंग्रजी विभागातील प्राध्यापिका प्रो. मनीमांगी मानी, जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या ऐतिहासिक अभ्यास केंद्रातील प्राध्यापक प्रो.उमेश कदम आणि मिझोरम विद्यापीठातील इतिहास आणि मानववंश विज्ञान विभागाचे प्राध्यापक प्रो. किशोर गायकवाड हे प्रमुख वक्ते लाभले आहेत. तसेच या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या औचित्याने मराठे कालीन नाण्यांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याच बरोबर या परिषदेमध्ये विविध विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन केले जाणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे नियोजन निमंत्रिका व इतिहास विभागप्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे आणि प्रा. भावेश भोईर यांनी केले आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील, आयक्यूएसी समन्वयक प्रो. (डॉ.) बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजन करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात निसर्ग छायाचित्रण स्पर्धा उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात १५ फेब्रुवारीला महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आंतर महाविद्यालयीन ऑनलाईन निसर्ग छायाचित्रण स्पर्धेचे आयोजन केले होते. बुधवारी (दि. २१) या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला तसेच स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक व पारितोषिके देण्यात आली.



या स्पर्धेसाठी ४ ते १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन पद्धतीने निसर्गावर वेगवेगळे छायाचित्रण विद्यार्थ्यांनी सादर केले होते त्यामध्ये मुंबई तसेच मुंबई बाहेरील वेगवेगळ्या महाविद्यालयाने सहभाग घेतला होता त्यामध्ये प्रामुख्याने राजाराम महाविद्यालय कोल्हापूर, त्रिमूर्ती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी जळगाव अशा वेगवेगळ्या महाविद्यांलयाचा समावेश आहे. या स्पर्धेमधील सुमारे १०५ विद्यार्थी व विद्यार्थिनीनी त्यांचे निसर्गा विषयी प्रेम, आपुलकी त्यांच्या छायाचित्रनांमधून सादर करून दाखवली. बुधवारी या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला तसेच स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक व पारितोषिके देण्यात आली.

स्नेहा यमगर, राजाराम कॉलेज कोल्हापूर हिने प्रथम क्रमांक पटकाविला, तसेच द्वितीय क्रमांक ईशान वानखेडे मूर्ती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी जळगाव याने पटकाविला, तृतीय क्रमांक वेदिका जाधव, रामशेठ ठाकूर महाविद्यालय खारघर या सर्व विजेत्यांना प्राध्यापक डॉ. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पारितोषिक देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विजेतांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख यांनी केले.

# बृहन्मुंबई मराठी व्याकरण परीक्षेत ‘सीकेटी’च्या मुलांचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बृहन्मुंबई निम्नस्तर मराठी शिक्षक संघटना यांच्यातर्फे मराठी व्याकरण परीक्षा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयात आयोजित करण्यात आली होती.



मराठी भाषेच्या विकासासाठी, प्रचारासाठी तसेच मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी बृहन्मुंबई निम्नस्तर मराठी शिक्षक संघटना नेहमीच प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्रातील शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य केली आहे. अमराठी विद्यार्थ्यांची शब्द संपत्ती वाढावी, संवाद साधताना आपले विचार मांडता यावेत, दैनंदिन जीवनात मराठीचा प्रभावी वापर करता यावा म्हणून नि.म.शि. संघटना १९८४ पासून मराठी भाषेचे अध्यापन करणारे शिक्षक, अध्ययन करणारे विद्यार्थी व त्यांचे पालक या सर्वांसाठी शैक्षणिक कार्य करीत आहे.

मराठी भाषेची गोडी लागावी, इंग्रजी, उर्दु, गुजराती अशा अमराठी शाळांतील विद्यार्थयांसाठी मराठी भाषा विषयक श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाची उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी संघटना प्रयत्न करीत आहे. अमराठी विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्रात राज्यभाषेसाठी कार्य करणारी, शालेय अभ्यासक्रमाशी संलग्न अशी शैक्षणिक संस्था आहे. राजभाषेला मानाचे स्थान मिळावे, मराठीभाषा समृद्ध व्हावी तिचा सन्मान व्हावा, मराठी भाषेचा दर्जा वाढावा यासाठी शालेय स्तरावर हातभार लावण्याचा प्रयत्न संघटना करीत आहे.

या परीक्षेत विद्यालयातील पाचवी ते सातवी एकूण ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी विशेष प्राविण्य १०, प्रथम श्रेणी १६, द्वितीय श्रेणी ७, तर तृतीय श्रेणी ९ विद्यार्थ्यांनी प्राप्त केली.

या परीक्षेसाठी मराठी विषय विभाग प्रमुख श्री प्रकाश पांढरे व इतर सर्व मराठी विषय शिक्षक यांनी विद्यार्थयाना प्रोत्साहित केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. संतोष चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या यशस्वी विद्यार्थाचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांजकडून हार्दिक अभिनंदन तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मेट्रो स्थानकातून सामानाची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरट्याने बेलपाडा मेट्रो स्टेशनच्या आवारातील पंप रुममध्ये ठेवलेली जनरेटरची बॅटरी, फायर यार्ड, मॅटेलिक हायड्रेट कनेक्टर तसेच लोखंडी पाइप व बाथरुमचे नळ असा सुमारे एक लाख ३० हजार रुपये किमतीचे सामान चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. खारघर पोलिसांनी या चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.अज्ञात चोरट्याने बेलापूर-पेंणधर या मेट्रो मार्गावरील बेलपाडा मेट्रो स्टेशनच्या बंदिस्त आवारात घुसून तेथील पंप रुममध्ये ठेवण्यात आलेली जनरेटरची बॅटरी, फायर यार्ड, मॅटेलिक हायड्रेट कनेक्टर तसेच लोखंडी पाइप व बाथरुमचे नळ असा सुमारे १ लाख ३० हजार रुपये किमतीच्या वस्तू चोरुन नेल्या. दिवसपाळीवर कामावर आलेल्या सुरक्षारक्षकांना हा प्रकार निदर्शनास आला.

यानंतर त्यांनी याबाबतची माहिती महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांना दिल्यानंतर त्यांनी याबाबत जाऊन पहाणी केली असता २ ते १४ फेब्रुवारीदरम्यान वस्तूंची चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर महा मेट्रो कंपनीतील सिक्युरिटी सुपरवायजरने गत शनिवारी याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


## संपादकीय

# दुबळी विरोधी आघाडी

एकीकडे विरोधकांच्या इंडिया आघाडीच्या चिरफळ्या उडत असल्याचे चित्र देशासमोर उभे राहात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी रोजच्या रोज अधिक प्रभावीपणे प्रचाराला दिशा देत आहेत.

**आगामी लोकसभा निवडणुकांवर डोळा ठेवून काँग्रेसकरिता जनतेमध्ये सकारात्मक भावना निर्माण करण्यासाठी राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या न्याय यात्रेला त्यांच्या यापूर्वीच्या भारत जोडो यात्रेइतका प्रतिसाद मिळत नसल्याचे लपून राहिलेले नाही. निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला तगडे आव्हान देण्यासाठी विरोधीपक्षांनी स्थापन केलेल्या इंडिया आघाडीचेही लोकसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर होण्याआधीच बारा वाजले आहेत. सगळ्यात आधी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री व तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी स्वबळावर लढण्याचा नारा देऊन आघाडीला तोंडावर पाडले. ममता दीदींपाठोपाठ आघाडीच्या इतरही घटक पक्षांनी एका मागोमाग एक राहुल गांधींच्या न्याय यात्रेकडे पाठ फिरवल्याने ही यात्रा आधीच्या भारत जोडो यात्रेच्या तुलनेत प्रभावाच्या बाबतीत बरीच फिकी पडल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. या आधीच्या भारत जोडो यात्रेमध्ये विरोधीपक्षांतील काही नेतेमंडळी राहुल गांधी यांच्यासमवेत चार पावले चालली होती, परंतु आताच्या न्याय यात्रेत मात्र राहुल गांधी एकटे पडल्यासारखेच दिसले आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार इंडिया आघाडीतून बाहेर पडल्याने बसलेल्या धक्क्यातून आघाडी अद्याप सावरलेली नाही. अलिकडेच नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूक अब्दुल्ला यांनीही स्वबळाचा नारा दिला आहे. एनडीएसोबत जाण्याचा पर्यायही खुला असल्याचे संकेत त्यांनी दिल्यानेच ते आघाडीतून बाहेर पडल्याची चर्चा सुरू झाली. नुकतेच शरद पवार यांनीही इंडिया आघाडीत काही ठिकाणी वादविवाद असल्याचे नमूद केले. काही पक्षांची भूमिका त्या-त्या राज्यापुरती सीमित आहे. काही राज्यांत वादविवाद आहे हे नाकारता येत नाही, परंतु हे वाद मिटवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पवार म्हणाले. एकीकडे अयोध्येतील बहुप्रतिक्षित मंदिरात श्रीरामलल्लांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून पंतप्रधान मोदींनी देशभरातील जनतेची मने जिंकून घेतली आहेतच. खेरीज रोज कुठल्या न कुठल्या कार्यक्रमाच्या निमित्ताने जनतेशी संवाद साधताना आपल्या अमोघ वक्तृत्वशैलीने मोदीजी 'अब की बार ४०० पार'चा मंत्र सहजपणे जनतेच्या मनावर कोरत आहेत. त्यांच्या 'मोदी की गॅरंटी' यांसारख्या वचनांना जनतेमध्ये स्वाभाविक अशी लोकप्रियता लाभत असताना विरोधीपक्षांचे नेते मात्र बहुतांशी तोंड मिटून गप्प असल्याचेच दिसते आहे. नुकताच भाजपच्या राष्ट्रीय अधिवेशनातूनही मोदींनी कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण केला. येणारे १०० दिवस नव्या ऊर्जेने, नव्या उत्साहाने, नव्या विश्वासाने काम करण्याचे आहेत. या शंभर दिवसांत प्रत्येक नव्या मतदारापर्यंत, प्रत्येक लाभार्थीपर्यंत, प्रत्येक वर्ग व समाजापर्यंत पोहोचायचे आहे असे म्हणत त्यांनी कार्यकर्त्यांना भरपूर ऊर्जा प्रदान केली. भारतरूपी मंदिर उभारण्याची जबाबदारी आपल्यावर साक्षात परमेश्वरानेच सोपवली आहे असे सांगणाऱ्या मोदीजींवर जनतेला पूर्ण भरवसा आहेच आणि त्यांच्यासमोर, त्यांच्या जवळपासही जाईल असा कुठलाच पर्याय विरोधकांमध्ये दिसत नाही याचीही पुरेपूर जाणीव लोकांना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व भारतीय जनता पक्षासमोर तितकेच सामर्थ्यपूर्ण आव्हान उभे करणे तर दूरच किमान आपली आघाडी नीट टिकवणेही विरोधकांना जमलेले नाही. चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर बुधवारी काँग्रेस आणि समाजवादी पक्षात उत्तर प्रदेशपुरते जागावाटपावर एकमत झाले असले तरी इंडिया आघाडीला लागलेली गळती पाहता आपली दुबळी प्रतिमा सावरण्यासाठी विरोधकांना आणखी बरेच प्रयत्न करावे लागतील.**

# किल्ले रायगडवर विकास प्राधिकरणातर्फे नवस्वराज्य निर्मिती






ब्रिटीशांचे राज्य असताना महात्मा जोतीराव फुले उपाख्यतात्या यांनी रायगडावर १८८६ साली तीन दिवस मुक्काम ठोकून शिवछत्रपतींची समाधी शोधून काढली. शिवजयंतीदेखील महात्मा जोतीराव फुले यांनीच सुरू केली आणि 'कुळवाडीभूषण पवाडा गातो भोसल्यांचा।छत्रपती शिवाजींचा।।' हा पोवाडाही महात्मा फुले यांनी रचला.

२०१२ साली श्रीशिवाजी स्मारक मंडळाने केंद्रीय पुरातत्व खाते आणि महाराष्ट्र शासनाला रायगड विकास आराखडा २०१२ सादर केला. २०१५ साली श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाच्या पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहिले. ६ जून २०१६ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी किल्ले रायगडच्या विकास आराखड्यासाठी ६०६ कोटी जाहीर केला आणि छत्रपती युवराज संभाजीराजे यांच्या अध्यक्षतेखाली रायगड किल्ला जतन संवर्धन आणि आराखडा प्राधिकरण स्थापन करण्यात आले.

रायगड किल्ला हा भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या ११ मार्च १९०९च्या अधिसूचनेनुसार राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात आला आहे. रायगड किल्ला जतन व संवर्धन प्रस्तावित रु.६०६.०९ कोटींच्या आराखडयास मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीने ३१ मार्च २०१७ रोजी मान्यता दिली. त्यामध्ये भारतीय पुरातत्व विभागामार्फत त्यांच्या पर्यवेक्षणाखाली करावयाची कामे रु.१२४१४.९३ लाख, रायगड किल्ला पाचाड येथील जिजाऊ समाधी व वाडा परिसरात पुरातत्व विभागाच्या पूर्व अनुमतीने घ्यावयाची कामे रु.४९५२.९१ लाख, रायगड किल्ला परिसरात घ्यावयाची पर्यटनाची कामे रु.७९९१ लाख, रायगड किल्ला व परिसरातील मुलभूत सुविधांची व विकासाची कामे (७ किमी परिघातील २१ गावे व त्या अंतर्गत वाड्या) रू.४२६० लाख, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व केंद्रीय भूतल परिवहन मंत्रालयामार्फत आणि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावयाची कामे रु.२०६०४ लाख, पाचाड येथे शिवसृष्टी व पर्यटक सुविधा केंद्र उभारण्यासाठी भूसंपादन रु.२५०० लाख, रज्जू मार्ग रु.५००० लाख, आकस्मित खर्च रु.२८८६.१३ लाख, एकूण आराखडा रु.६०६०८.९७ लाख आहे.

रायगड किल्ल्यातील सर्व प्राचीन वास्तूचे संवर्धन, तत्कालीन पद्धतीच्या मार्गिका, तत्कालीन पद्धतीचे सागाचे दरवाजे, तटबंदीला पाईटिंग व अंडरपिनींग करणे, तलावातील गाळ काढणे, लॅन्डस्केपिंग, पर्यटकांच्या सोयी सुविधा, पोलीस चौकी व निवास व्यवस्था, राजमाता जिजाऊंच्या वाड्याचे संवर्धन, राजमाता जिजाऊंच्या समाधीचे संवर्धन, पाणीपुरवठा योजना, वृक्षलागवड, किल्ला प्रदिपन आणि ध्वनी व प्रकाश योजना, शिवसृष्टी, परिक्रमा मार्ग, रज्जूमार्ग इत्यादींचे सक्षमीकरण करणे आदी कामे करण्यात येणार आहेत.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

केंद्रीय पुरातत्व खात्याच्या नियमानुसार ऐतिहासिक वास्तूंचे फोटो व चित्रे उपलब्ध असल्यास त्याप्रमाणे पुनर्बांधणी करता येत असून जेव्हा रायगड किल्ला बिटिश कर्नल प्रॉथर यांनी जिंकला; तेव्हा तेथील वास्तूचे रेखाचित्र व आराखडे काढले होते. कर्नल प्रॉथरने तयार केलेले रेखाचित्र प्राप्त झाले असून त्यावेळचा आराखडा उपलब्ध झाला नसल्याने रायगड किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्याच्या कामाला गती मिळूनही पुनर्बांधणी करण्यासाठी खूप मर्यादा निर्माण झाल्या आहेत, मात्र रायगडावरील उत्खननादरम्यान अनेक शिवकालीन वस्तूंचा खजिना दिसून आला त्यामध्ये देवांच्या मूर्ती, स्वयंपाकाची भांडी, दागिने, अवजारे, शस्त्र, बंदुकीच्या गोळ्या अशा अनेक वस्तूंसह दळणाची जातीदेखील आढळून आल्याने शिवकालीन सभ्यता व संस्कृतीचाही अंदाज येत आहे.

रायगड किल्ला जतन संवर्धन आणि आराखडा प्राधिकरणाच्या कामांमध्ये प्रामुख्याने शिवसमाधी, वाघ्या कुत्रा समाधी, वाघदरवाजा, पालखी दरवाजा, राणीवसा, अष्टप्रधान वाडे, मनोरे, श्रीशिरकाई मंदिर, जगदीश्वर मंदिर, बाजारपेठ, हत्तीखाना, महादरवाजा, गडावरील निवासस्थानांचे अवशेष, चोरदिंडी, भवानी टोक, कुशावर्त तलाव, नाणे दरवाजा, राजसभा, राजभवन, नगारखाना, चित्तदरवाजा, खूबलढा बुरुज, हिरकणीचा बुरुज, वाघबीळ, मस्जिद मोर्चा, भवानी टोक, टकमक टोक, गंगासागर तलाव, कोळींब तलाव, कुशावर्त तलाव आणि पाचाड येथील जिजामाता समाधी, जिजामाता वाडा या त्याचा समावेश जतनासाठी करण्यात आलेला आहे. आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थापन विकलांग व्यक्तींसाठी व्यवस्थापन शिलालेखांचे संवर्धन आणि संरक्षण प्रवासी थांबे साऊंड अँड लाईट शो, बागबगीचा आणि सुशोभीकरण रेलिंगची दुरूस्ती, महत्त्वाच्या दरवाजांची दुरूस्ती, मार्गदर्शक फलक आणि नकाशे लावणे, गडावरील महत्त्वाच्या मूर्तींना वज्रलेप करून पुन्हा झळाळी आणण्याचा प्रयत्न करणे, पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही कॅमेरा, विजेच्या अंडरग्राउंड तारा तसेच गडावरील ८४ तलाव स्वच्छ करण्याचे काम हाती घेण्यात येणार असून आतापर्यंत २१ तलावांतील साथीला गाळ माती यांच्या उपसा करून जलसंचय करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. शिवराजधानी रायगड किल्ल्यावरील रायगड जिल्हा परिषदेने बांधलेले विश्रामगृह, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने बांधलेले विश्रामगृह यांची दूरवस्था आता जिर्णाद्धाराने कात टाकतील अशी शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी महाड ते रायगड हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग घोषित केला आहे या रस्त्याचे रुंदीकरण सुरू झाले आहे. पायथ्याशी पाचाड येथे महाराष्ट्र शासनाने ८८ एकर जमीन अधिग्रहित केली असून येथे शिवराजधानी किल्ले रायगड येथे नव्या पर्यटकांना शिवसृष्टी आणि माहिती केंद्र उभारून पूर्ण माहिती देण्यात येणार आहे.

रायगड किल्ल्याच्या वैभवशाली इतिहासाला नवस्वराज्याची झळाळी प्राप्त होण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारचे प्रयत्न लवकरच यशस्वी होतील अशी अपेक्षा असून अरबी समुद्रातील शिवस्मारकाच्या भूमिपूजनप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या धोरणानुसार रायगडच्या विकास प्राधिकरणासोबत अन्य सरकारी व केंद्रसरकारी विभागांमार्फत भरीव विकास योजनांनी गती घेतली आहे. पुरवणी मागणीद्वारे मंजूर ४० कोटी निधी पैकी ५० टक्के निधी एमटीडीसीकडील कामांना उपलब्ध करून देण्यात येत असून यांच्याकडून अंदाजपत्रक मागविण्यात आलेली आहेत. रायगड किल्ला येथे पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्यासाठी, शिवसृष्टी, पर्यटकांसाठी निवास व्यवस्था, पार्किंग इत्यादी कामे करण्यासाठी भूसंपादन करण्यासाठी रु.२१.१८ कोटी रक्कमेस मान्यता व रु.१०.५० कोटी निधी उपविभागीय अधिकारी महाड यांना वितरीत करण्यात आला आहे. आवश्यक असलेल्या भूसंपादनापैकी ८८ एकर क्षेत्रास शेतकऱ्यांची सहमती प्राप्त झाली आहे. राष्ट्रीय महामार्ग महाड ते पाचाड करीता आवश्यक १८ हेक्टर भूसंपादनासाठी एकूण खातेदारापैकी २२८ खातेदारांची सहमती प्राप्त झाली आहे. महाड ते पाचाड या २५.५० किमी. राष्ट्रीय महामार्गाचा भूसंपादनासह रु.२५८ कोटींचा डीपीआर तयार करून केंद्र शासनास मान्यतेस सादर केला आहे. रायगड परिक्रमा मार्गासाठी रु.२.०४ कोटींचे सविस्तर अंदाजपत्रक तयार केले आहे. जिजामाता समाधी परिसर बागबगीच्यासाठी सविस्तर अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार केले आहे. रायगड किल्ल्यावरील कुशावर्त तलाव व इतर तलावातील गाळ काढण्याचे काम स्वयंसेवी संस्था तसेच महसूल विभागाच्या मदतीने श्रमदानातून सुरू करण्यात आले आहे. पुरातत्व विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधी, वाडेश्वर मंदिराकडे जाणारी पायवाट, राजसदर, गंगासागर तलावातील गाळ काढणे ही कामे सुरू असून महादरवाजाचे काम पूर्ण झाले आहे. दोन कोटी वृक्ष लागवड मोहिमेंतर्गत रायगड किल्ल्यावर वृक्ष लागवडीचा विशेष उपक्रम राबविण्यात आला आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# 'शाओमी'चा पॅड ६एस प्रो आज होणार लाँच

शाओमी कंपनीच्या पॅड ६एस प्रोचे लवकरच चीनमध्ये अनावरण होणार आहे. या नव्या टॅबचे काही



फीचर्स आई स्पेसिफिकेशनबद्दल कंपनीने स्वतःहून माहिती उघड केली आहे. या मॉडेलचे डिझाइन हे सीरिजमधील आधीच्या मॉडेल्ससारखेच आहे. केवळ बेस व्हेरिएंट भारतामध्ये सादर करण्यात आला आहे, मात्र तो आपल्या भारतात कधी लाँच होईल याबद्दलची माहिती कंपनीने अद्याप दिलेली नाही. शाओमोचा हा टॅबलेट किती वाजता लाँच होणार आहे आणि याचे फीचर्स, स्पेसिफिकेशन काय आहे ते पाहू.

शाओमी कंपनीने Xiaomi Pad 6S Pro २२ फेब्रुवारी रोजी स्थानिक वेळेनुसार संध्याकाळी ७ वाजता भारतीय वेळेनुसार ४.३० वाजता लाँच करणार असल्याची माहिती पोस्टमध्ये दिली आहे. हा टॅब पॉवर्डबाय Qualcomm's Snapdragon ८ Gen २ SoC असून शाओमीच्या नव्या HyperOS out-of-the-boxवर काम करेल. कंपनीने शेअर केलेल्या फोटोमध्ये या टॅबचा किबोर्ड मॅग्नेटिक सपोर्ट किबोर्ड असणार असल्याचे दिसते.

Xiaomi Pad 6S Proमध्ये १२.४ इंचाचा LCD पॅनेल असेल, ज्याचे रेझोल्यूशन ३K, १४४Hz रिफ्रेश रेट आणि ३:२ हा अस्पेक्ट रेशो असणार आहे. हा टॅबलेट १२०W एवढ्या जलद गतीच्या वायर चार्जिंगला सपोर्ट करेल, अशी आत्तापर्यंत माहिती कंपनीने दिली असल्याचे gadgets३६०च्या एका लेखावरून समजते.


याआधी लीक झालेल्या माहितीनुसार Xiaomi Pad 6S Proमध्ये २४GB रॅम आणि १TB ऑनबोर्ड स्टोरेज असण्याची शक्यता आहे तसेच कदाचित यामध्ये १०,०००mah एवढ्या शक्तीची बॅटरी आणि ५० मेगापिक्सेल प्रायमरी रिअर कॅमेरादेखील असू शकतो.

Xiaomi Pad 6S Pro हा टॅब आधीच्या Xiaomi Pad ६ Proपेक्षा थोडा महाग असेल असे म्हटले जात आहे.

चीनमध्ये Pad ६ Pro Mr ८GB + १२८GB या मॉडेलची किंमत अंदाजे २८,५०० रुपये अशी आहे, तर ८GB + २५६GB या मॉडेलची अंदाजे किंमत ३२ हजार रुपये इतकी आहे. १२GB + २५६GB या मॉडेलची अंदाजे किंमत ३५,७०० रुपये इतकी आहे. आणि १२GB +५१२GB या मॉडेलची अंदाजे किंमत ३९ हजार रुपये इतकी आहे.

# लेखक, दिग्दर्शक प्रा.लक्ष्मण देशपांडे

डॉ. लक्ष्मण देशपांडे एक बहुरंगी मराठी लेखक, नाट्यदिग्दर्शक व अभिनेते होते. त्यांचा जन्म ५ डिसेंबर १९४३ रोजी झाला. ते लहानपणी गणपती उत्सवात होणाऱ्या मेळा नावाच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत भाग घेत. तेथेच त्यांच्यातील कलावंताची जडणघडण झाली.



घरची परिस्थिती प्रतिकूल असूनही लक्ष्मण देशपांडे यांनी एमए व त्यानंतर एमडी (मास्टर इन ड्रॅमॅटिक्स)चे शिक्षण घेतले. मौलाना आझाद, सरस्वती भुवन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केल्यावर १९८०मध्ये ते औरंगाबाद विद्यापीठात शाखाप्रमुख म्हणून कार्यरत झाले. याचदरम्यान त्यांनी 'वऱ्हाड निघालंय लंडनला'ची निर्मिती केली. या नाटकाने अनेक विक्रम प्रस्थापित केले. हजारोंच्या संख्येने लोक प्रयोगांना हजर राहात. अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, मस्कत, ऑस्ट्रेलिया, कतार, कुवेत, सिंगापूर, थायलंड, नायजेरिया येथेही वऱ्हाडचे प्रयोग झाले.

एकाच व्यक्तीने ५२ व्यक्तिरेखा साकारण्याचा विक्रम केल्याबद्दल त्यांची २००४मध्ये गिनीज बुकातही नोंद झाली. या नाटकाचा पहिला प्रयोग त्यांनी १९७९मध्ये केला होता. तेव्हापासून या

**निमित्त**

नाटकाचे १,९६०पेक्षा अधिक प्रयोग सादर करण्याचा विश्वविक्रम त्यांच्या नावावर आहे. या तीन तासांच्या एकपात्री प्रयोगात ते ५२ रूपे सादर करायचे. त्यामुळे लोक त्यांना वऱ्हाडकर म्हणायचे. त्यांनी वऱ्हाड निघालंय लंडनला या नाटकाचे पुस्तक प्रकाशित केले. त्याच्या दोन आवृत्त्या निघाल्या. 'प्रतिकार' हे त्यांनी लिहिलेल्या एकांकिकांचे पुस्तकही रसिकांना भावले. 'मौलाना आझाद-पुनर्मूल्यांकन' या पुस्तकाचे तसेच महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या अक्षरनाद या पुस्तकाचे संपादन त्यांनी केले.

'रेशमगाठी', 'पैंजण' या मराठी चित्रपटांतही त्यांनी काम केले. याशिवाय त्यांनी द्विपात्री 'नटसम्राट' या नाटकातही काम केले. २०००मध्ये त्यांनी औरंगाबाद विद्यापीठातून स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्याच वर्षी त्यांची परभणी येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली. अशा या महान लेखकाचे २२ फेब्रुवारी २००९ रोजी निधन झाले.

प्रा. लक्ष्मण देशपांडे यांना मिळालेले काही पुरस्कार असे आहेत २००३ : महाराष्ट्र शासनाचा कलावंत पुरस्कार, २००४ : विष्णूदास भावे पुरस्कार. याशिवाय छत्रपती शाहू महाराज, बेंडे स्मृती, राम श्रीधर, अल्फा टीव्ही, पुरुषोत्तम करंडक, वसंतराव नाईक कृषी संशोधन प्रतिष्ठान, सयाजीराव महाराज यांच्या नावाचे पुरस्कार. अखिल भारतीय नाट्य परिषदेतर्फे साहित्यसम्राट आचार्य अत्रे पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. चित्रपट किंवा नाट्यक्षेत्रात स्थिर होताना पुणे आणि मुंबई येथून कामाची पावती मिळाली तरच या क्षेत्रात प्रभाव पडतो हा समज त्यांनी खोडून काढला. उच्च शिक्षण घेतल्यानंतर आपल्या प्रतिभेच्या जोरावर त्यांनी लेखन आणि दिग्दर्शन क्षेत्रात नावलौकिक मिळवला. त्यांना स्मृदिनरानिमित्त विनम्र अभिवादन! **(साभार इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**नागोठणे : नागोठणे, वाकण, सुकेळी भागातील रस्ते जेसीबी व फोकलेनने फोडले जात असून या भागातील रस्ते सिमेंट काँक्रीट केले जाणार आहेत, मात्र या रस्त्यांचे काम धिम्या गतीने सुरू असून प्रवासी धुळीने हैराण झाले आहेत. त्यामुळे रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.**

## आरोग्य प्रहर

# हिवाळा संपता संपता कडू पदार्थ का खावेत?

प्रत्येक ऋतूमध्ये निसर्गामध्ये होणाऱ्या बदलांच्या परिणामी त्या ऋतुमध्ये एक रस प्रबळ होतो. ज्यामुळे त्या-त्या ऋतूमध्ये



निसर्गामधील पाणी, वनस्पती, प्राणी आदी सर्वच सजीव गोष्टींमध्ये त्या कडू रसाचा (चवीचा) प्रभाव वाढतो. साहजिकच त्या पाण्याचे प्राशन व त्या वनस्पतींचे व प्राण्यांचे सेवन केल्याने मानवाच्या शरीरामध्येसुद्धा त्या रसाचा प्रभाव होतो. त्यानुसार त्या रसाचे (चवीचे) गुणदोष शरीरावर व आरोग्यावर दिसतात. हिवाळ्याच्या आरंभी अर्थात हेमंत ऋतुमध्ये मधुर रस प्रबळ होतो, जो थंडीतल्या हवामानाला व आरोग्याला पोषक सिद्ध होतो. याउलट हिवाळ्यातल्या उत्तरार्धामध्ये म्हणजे कडक थंडीच्या शेवटच्या आठवड्यांमध्ये अर्थात शिशिर ऋतूमध्ये कडू रस प्रबळ होतो.

शिशिर हा एक ऋतू असा आहे ज्या ऋतूमध्ये प्रबळ होणारा रस (चव) हा आरोग्याला उपकारक होतो. वास्तवात कडू चवीचे पदार्थ बलवर्धक नाहीत, मात्र कडू रसाचा मोठा गुण म्हणजे तो कफनाशक आहे. शिशिरा आधीच्या हेमंत ऋतूमध्ये गोडाचा प्रभाव असतो. त्याला गोडधोड, पौष्टिक व स्निग्ध खाण्याची जोड मिळालेली असते. शिशिर ऋतूमध्ये अग्नी हेमंतापेक्षाही प्रखर होत असल्याने या दिवसांमध्येसुद्धा भूक वाढते व खाल्लेले पचतेही, जेवण अधिकच खाल्ले जाते तेसुद्धा गोड व पौष्टिक. वातावरणातला थंडावा आणि दीर्घकाळ गोड, स्निग्ध व पौष्टीक आहार यांच्या परिणामी शरीरामध्ये कफ वाढत जातो. स्वाभाविकरित्या शिशिर ऋतूमध्ये कफाचा संचय होतो. शरीरात साचत-वाढत जाणाऱ्या कफाला नियंत्रणात नियंत्रणात ठेवण्यास निसर्गतः शरीरात वाढणारा हा कडू रस उपयुक्त सिद्ध होतो.

षड्रस म्हणजे सहा रस - गोड, आंबट, खारट, कडू, तिखट व तुरट. या सहा चवींच्या आधारावर आयुर्वेदाने शरीराचे आरोग्यजतन कसे करता येईल, आरोग्याचे संवर्धन कसे करता येईल, रोग कसे टाळता येतील एवढंच नव्हे तर रोगाचे निदान कसे करावे, समोर आलेल्या रुग्णाच्या आजाराची कारणे कशी ओळखावी, त्या रोगाचा प्रतिकार कसा करावा, चिकित्सेमध्ये कोणती औषधे वापरावी व पथ्य कोणते करावे या सर्व बाबींवर व्यापक विचार केला आहे. या सहा रसांचा मानवी शरीरावरील हितकारक व अहितकारक परिणाम, गुण-दोष, रोगनाशक गुणधर्म, एवढंच नव्हे तर त्यांच्या अतिसेवनाने शरीरावर होणारे परिणाम या सर्वांचा आयुर्वेद शास्त्राने केलेला सविस्तर अभ्यास बघितला की मस्तक पूर्वजांच्या निरीक्षणशक्तीसमोर झुकते. दुर्दैवाने आयुर्वेदाने केलेल्या या अनमोल मार्गदर्शनाचा आज विसर पडला आहे. वास्तवात हे मूलभूत ज्ञान २१व्या शतकामधील अनेक आजारांपासून प्रतिबंध करण्यासाठी उपयुक्त आहे.

# मुरुडमध्ये १८ हजार क्विंटल भात खरेदी

## हमी भावामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील आंबोली येथील आदिती ॲग्रो खार अंबोली या हमीभाव भात खरेदी केंद्रावर आतापर्यंत १८ हजार क्विंटलची विक्रमी खरेदी करण्यात आली आहे. यंदा २१८३ रुपये इतका भाताला हमी भाव राज्य शासनाच्या पणन विभागाकडून मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. यंदा वाढीव बोनस जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

मुरुड तालुक्यात एकूण तीन भातविक्री केंद्र असुन तालुक्यात खार आंबोली, बोर्ली–मांडला व तळेखार येथे भात हमीभाव केंद्र उघडण्यात आले आहेत. पूर्वी भाताची काढणी झाल्यानंतर खासगी व्यापारी अल्प मोबदल्यात भात खरेदी करत असत त्यामुळे भातशेतीचा व्यवसाय आतबट्ट्याचा होत असे.

मिठागर, सावली, नांदले, उसरोली, टोकेखार, आगरदांडा, जमृतखार, हाफिजखार, उंडरगाव, वाणदे, जोसरांजण, शिघ्रे, नवीवाडी, नागशेत, वावडुंगी, वेळास्ते, आदाड, नांदगाव आदी गावांतून भात केंद्रावर खरीप हंगामाचा भात आणला जातो. भात खरेदीचे आदेश पणन विभागाकडून लवकर प्राप्त झाले तरी प्रत्यक्ष भात खरेदीला डिसेंबर २०२४ पासून सुरुवात झाली. भात खरेदी सुरू झाल्यापासून खासगी व्यापाऱ्यांकडून होणारी आर्थिक फसवणूक टळली असून प्रति क्विंटल २१८३ रुपये हमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा होत आहेत.

गेल्या वर्षाप्रमाणे यंदा बोनस सरकारने अद्याप जाहीर न केल्याची तक्रार उंडरगावचे शेतकरी महादेव नागोजी भोईट यांनी केली आहे. तर भात शेतीला पेरणीपासून काढणीपर्यंत एकरी १५ ते २० हजार रुपये खर्च करावा लागतो. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धतीमुळे सामाईकरित्या शेतात माणसे राबवायची, त्यामुळे भात शेती परवडत असे. आता मात्र मजुरांची समस्या भेडसावत असुन भात पेरणी ते काढणीपर्यंत करावा लागणाऱ्या खर्चाची उत्पन्नातून जेमतेम तोंड मिळवणी होत असल्याची व्यथा शेतकरी वर्ग मांडत आहे.

शासनाकडे भाताला वाढीव भाव व बोनस वाढवून मिळावा यासाठी स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांना खार आंबोलीचे माजी सरपंच मनोज कमाने, प्रभाकर धर्मा पाटील, अनिल कमाने, गणेश म्हात्रे, मदन भोईर आदींनी भेट घेऊन निवेदनही दिले आहे.

कोकणातील सर्व आमदारांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनदरबारी हा प्रश्न मांडून वाढीव बोनस जाहीर करावा, अशी विनंती केली आहे.

**हमीभाव केंद्रावर भात विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना बोनस द्यायचा की नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना सरसकट बोनस द्यायचा याचा शासन आदेश अद्याप प्राप्त झालेला नाही. गत वर्षी प्रति हेक्टर बोनस दिला होता.**
**–के. बी ताटे, पणन अधिकारी, रायगड**

# चौक येथे रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू

## डॉक्टरांचा हलगर्जीपणा असल्याचा कुटुंबीयांचा आरोप

**चौक, खालापूर : प्रतिनिधी**

चौक येथील ओम साई हॉस्पिटलमध्ये दीपक शंकर पोपेटे या ४० वर्षीय तरुणाचा मृत्यू ओम साई हॉस्पिटलचे डॉ. अच्युत हाडकुळे यांच्या हलगर्जीपणामुळे झाल्याचा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. चौक पोलीस दुरक्षेत्र येथे आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दिपक शंकर पोपेटे याच्या छातीत दुखु लागल्याने रात्री एकच्या सुमारास त्याला चौक येथील ओम साई हॉस्पिटलमध्ये कुटुंबीयांनी दाखल केले. त्यावेळी रात्री डॉ. अच्युत हाडकुळे दवाखान्यात होते. त्यांनी इसीजी करून सलायन लावली, पण इसीजीचा रिपोर्ट रुग्णासाठी चांगला नव्हता, असे त्यांचे नातेवाईक यांचे म्हणणे आहे. या हॉस्पिटलमध्ये अशा रुग्णांची तपासणी करण्यास डॉक्टर आणि यंत्रणा सक्षम नसल्याने पुढील उपचार करण्यासाठी इतरत्र पाठवणे आवश्यक होते, तसे न करता डॉक्टरांनी तपासणी करून स्वतः झोपी गेले.




असे रुग्णांच्या नातेवाईक यांचे म्हणणे आहे,

डॉ. अच्युत यांना चौक पोलीस दूरक्षेत्र येथे ठेवण्यात आले असून मृतदेह वैद्यकिय तपासणीसाठी चौक शासकिय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मृताचा वैद्यकिय अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल, असे चौक पोलीस यांच्याकडुन सांगण्यात आले आहे.

डॉ. अच्युत यांचे म्हणणे की, रुग्णाचा रक्तदाब बरोबर होता, रुग्णाच्या बरोबर असेलल्या व्यक्तीबरोबर त्यांची मागील वैद्यकीय माहिती घेत असता, त्यांना ट्रीटमेंटची गरज होती. अचानक त्यांना हृदयाचा तीव्र झटका आला.

## निवडक

### कर्जतमध्ये वृद्धांना फळे, बिस्किटे



कर्जत : शिवजयंती निमित्तानें राज माता जिजाऊ फाउंडेशन या सेवा भावी संस्थेच्या च्या मध्यमातुन हॅपी फ्लॉक फाउंडेशन संचालित ओल्ड एज होम कर्जत येथील सर्व वृद्धांना फळे व बिस्किटे वाटून सजरा केला. या वेळी जिजाऊ फाउंडेशन अध्यक्षा पूजा सुर्वे व सहकारी रेखा देशमुख, पायल लांगी, मनीषा पवार, पल्लवी कनोजे, कांचन देशमुख, पंकेश जाधव, दिव्यांशु सुर्वे तसेच वृद्धाश्रमच्या संस्थापिका देसाई व इतर कर्मचारी वर्ग उपस्थितीत होते.

### कातकरवाडी व खैरवाडी शाळेस मदत

पाली : रा. जि.प. शाळा– आताणे कातकर वाडी व खैरवाडी ह्या शाळेस न्युओ–स्माईल फाउंडेशन दादर मुंबई यांचेकडून शाळेस दोन रेडी टॉयलेट व लॅपटॉप भेट देण्यात आला. तसेच शाळेस एक वर्गखोली व व्हरांडा यांना लादी बसवून लावून देण्यात आली. तसेच शाळेला लॅपटॉप भेट देण्यात आला. या कार्यक्रमास न्युओ स्माईल फाउंडेशनचे सिमरन सिंग, तन्मय मुखर्जी, दीनानाथ तिवारी विकास भिलारे, राजेश घाग हजर होते. गावात तसेच ग्रुप ग्रामपंचायत आतोणेच्या सरपंच ठकीताई हिलम, मुख्याध्यापिका सुप्रिया भिलारे, सुनील भिलारे, सुभाष चव्हाण, राजश्री घाग, प्राजक्ता भिलारे, विकास भिलारे व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य हजर होते.



### खारापटी येथे शिवजयंती उत्सव

रोहे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या अवचितगड या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या रोहा तालुक्यातील खारापटी गावात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामस्थांच्यावतीने पहाटे अवचितगड किल्ला ते मेढा मार्गे खारापटी मशाल यात्रा काढण्यात आली. शिवजयंतीच्या दिवशी दिवसभरात महाराजांचा अभिषेक, पूजा आणि आरती घेण्यात आले. विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. सायंकाळी आर्यन प्रशांत बर्डे यांचे शिवव्याख्यान झाले. खरापटी गावातील ज्येष्ठ ग्रामस्थांनी शिवकालीन लाठी काठी कला सादर केली. ऐतिहासिक विषयावर शालेय विद्यार्थ्यांचे वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. शिवजयंती उत्सवासाठी खारापटी ग्रामस्थ, महीला मंडळ यांनी परिश्रम घेतले.

# पेणमध्ये भाजपतर्फे हळदीकुंकू समारंभ



**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण, पाली, सुधागड, रोहा मतदार संघाचे आमदार रवीशेठ पाटील भाजप जिल्हा अध्यक्ष धैर्यशील पाटील भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या प्रयत्नाने भाजप पेण तालुका महिला यांच्या वतीने तालुक्यातील ग्रामीण भागातील गावागावात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून तसेच भाजपच्या महिला मोर्चाच्या उपाध्यक्षा शर्मिला पाटील यांच्या पुढाकाराने हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी व्यासपिठावर रायगड जिल्हा परिषदेच्या माजी जिल्हा परिषद सदस्या कौसल्या पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा ॲड. निलिमा पाटील यांसह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.

पेण तालुक्यातील तांबडशेत, कळवे, जोहे भागातील महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी महिलांचे औक्षण करून, हळदीकुंकू आणि वाण तसेच भेटवस्तू देऊन महिलांचा मान सन्मान करण्यात आला.

भाजपच्या महिला मोर्चाच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षा शर्मिला पाटील यांनी महिलांचा आत्मसन्मान वाढवून स्त्री आता फक्त घरात बसुन न राहता समाजातील प्रत्येक क्षेत्रात तिने आपला ठसा उमटवला आहे, आपला दबदबा निर्माण केला आहे, केंद्र सरकारसह राज्य सरकारने महिलांसाठी विविध प्रकारच्या योजना आणल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांच्या संरक्षणासाठी नवनवीन कायदे अमलात आणले आहेत त्याचा फायदा महिलांना होत आहे. त्यामुळे आता स्त्रियांनी अशाच संघटित, एकत्रित राहून एकमेकींना मदत करून पुढे जायला पाहिजे, असे सांगितले.

**'नारी शक्ती ही सर्वांत मोठी शक्ती'**

महिलांना मार्गदर्शन करताना शर्मिला पाटील यांनी आपली नारी शक्ती हीच देशातील सर्वात मोठी शक्ती असुन आज आपण ईथे जशा सर्वजणी एकत्र जमलो आहोत तशाच संघटीत होऊन प्रत्येक काम केले पाहिजे असे सांगितले.





**रोहा : निडी तर्फे अष्टमी राजिप शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवजयंतीनिमित्त निडी गावात पारंपरिक वेशभूषा परिधान करून मिरवणूक काढली होती.**

### उरण नगरपरिषद, उरण
### निविदा सूचना

जा.क्र.उनप/आरोग्य/२८८५ /२०२३–२४
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :– २१/०२/२०२४

उरण नगर परिषद खाली नमुद केलेल्या कामाकरिता नोंदणीकृत अथवा अनुभवी कंत्राटदाराकडुन मोहरबंद निविदा/दरपत्रके मागवित आहे. निविदा/दरपत्रक दिनांक : ०१/०३/२४ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद उरण यांचे नावे दाखल करणेच्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषद हद्दीत स्वच्छ सर्वेक्षण २०२४–२५ अंतर्गत नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयक जनजागृती करणे, पथनाट्य सादर करणे, तसेच सभा प्रशिक्षण शिबिर आयोजीत करणे, स्वच्छतेबाबत जिगल तयार करणे, स्वच्छतेबाबत विविध स्पर्धांचे आयोजन करणे करिता वार्षीक ठेकेदार नियुक्त करणे. | ९९००/– | २०००/– |
| २ | उरण नगरपरिषद हद्दीतील सर्व शौचालयांमध्ये एक्सॅस फॅन, सॅनेटरी वेंडीग मशीन, इनसिनेटरन मशीन बसविणे कामी ठेकेदार नियुक्त करणे. | ५०००/– | १०००/– |
| ३ | उरण नगर परिषद हद्दीतील सर्व उद्याने तसेच विविध सार्वजनिक ठिकाणे, फुटपाथ, चौक आशा ठिकाणी सर्जनशिल कल्पनेच्या अधारे सुशोभीकरण करणे करिता अनुभवी ठेकेदार नेमणे. | ९९००/– | २०००/– |
| ४ | उरण नगरपरिषद हद्दीत ICT (Information Communication Technology) अंतर्गत कचरा/कर्मचाऱ्यांचे नियोजन करणे. | ९९००/– | २०००/– |
| ५ | उरण नगरपरिषद हद्दीतील निसर्गऋण बायोगॅस प्लांटची देखभाल दुरुस्ती करणे. | ९९००/– | २०००/– |

सदर कामाच्या अटी व शर्ती आरोग्य विभाग / स्वच्छता विभागातुन माहिती करिता उपलब्ध असुन इच्छुक ठेकेदारांनी आरोग्य विभाग प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

सही/–
**(समीर जाधव)**
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद, उरण

# चौकमध्ये सुरुंगाच्या धक्क्याने हादरे

**चौक : प्रतिनिधी**

गेले काही दिवस वावंढळ, भिलवले, आसरे, विणेगाव, चौक परीसरात सुरुंग सदृश धक्के बसत असून सकाळच्या दरम्यान घरे हादरली जातात, अनेक ठिकाणी घरातील भांडीदेखील पडल्याची चर्चा सुरू आहे.

वावंढळ परिसरातील गावात सकाळच्या वेळेस मोठ मोठे हादरे बसत आहेत, जणू काही भुकंप झाला आहे असे वाटते. खालापूर तहसीलदार यांनी संबंधीत विभाग आणि ज्यांची कामे सुरू आहेत. त्यांच्याकडून माहिती घेऊन बिना परवानगी कुणी सुरुंग उडवत असेल आणि कायद्याचे पालन करीत नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिशीने कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सांगण्यावरून मी **कै. मानकुबाई बाळकृष्ण पाटील** (मयत) तर्फे वारस १) बाबुराव बाळकृष्ण पाटील २) प्रवीण बाळकृष्ण पाटील रा. रा. घर नं ३०१, मु. मोठीजुई, जुई, जि. रायगड ४१०२०६; ३) अलका जनार्दन शिवा रा. घर नं ४५१, पो– कासू, पेण, जि. रायगड ४०२१०७; ४) विमल भानुदास बंडा ५) भारती बाळकृष्ण पाटील उर्फ सौ. चेतना चंद्रशेखर शामा रा. गावदेवी पाखाडी, मुरुड, जंजिरा, रायगड ४०२४०१ व ६) कलावती बाळकृष्ण पाटील (''जमिन मालक'') यांचे खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती संदर्भातील ('सदर मिळकत') स्वामित्व हक्क तपासात आहे.

तरी सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत आगर तिचे हिश्श्याच्या बाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा इसम/इसमांचा कोणताही कोणत्याही प्रकारचा व/किंवा कोणत्याही कराराद्वारे मागणी, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, कुळ, पोटकुळ, लिज, सबलिज, गहाण (ईक्विटेबल किंवा कोणत्याही प्रकारचे), बक्षीस, लिन, चार्ज, न्यास, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, दान, ताबा, कब्जा, ईजमेंट, असाईनमेंट, लायसन्स, निशाणी (डीवाईस), डिमाईस, वाटप, प्लेज, कौटुंबिक व्यवस्थापन, विकसन हक्क, सह उद्योग, भागीदारी, सहयोग, कर्ज, आगाऊ देणे, भुसंपादन, लेखी मागणी, बोजा, एफएसआय/टीडीआर हक्क/वापर, मनाई किंवा इतर ऑटॅचमेंट अथवा कोणत्याही कोर्टाचा अधिकाऱ्यांचा, न्यायाधिकरणाचा, महसुली वा सविधी मान्य (स्टॅट्यूटरी) अधिकाऱ्यांचा, प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हुकूमनामा, आदेश, ॲवॉर्ड अथवा न्याय निर्णय, जप्ती, चालू वहिवाट आगर लागू केलेल्या कायद्याप्रमाणे निर्माण झालेला हक्क, अग्रक्रयाधिकार, इतर कोणताही कोणत्याही प्रकारचा क्लेम, हक्क, असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात, याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती संबंधी दावा/दावे, क्लेम, हरकती, जे कोणते असतील, ते अशा व्यक्तीने/व्यक्तींनी सोडले व/किंवा त्यागले आहेत असे समजणेत येईल.

**परिशिष्ट**
**मौजे जुई ता. उरण जि. रायगड**

| भूमापन क्रमांक | उपविभाग क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४९ | ६ | ०–०७–६० | ०.१६ |
| ४८ | ३ | ०–२४–८० | ०.५२ |

दिनांक : २२/०२/२०२४

सही /–
**ॲड. वृषाली नायर (पाटील)**
फ्लॅट न. १६, दूरवाणि सी.एच.एस., वामन राव पै मार्ग, सेक्टर ६, सी.बी.डी. बेलापूर ४००६१४. मोबाईल नं. ९१३७१३३९१८.

### टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन – तुकडी जिल्हा रायगड पोट तुकडी तालुका मुरूड, मौजे उसडी गावचे शिवरातील खालील वर्णनाच्या मिळकती मे. ग्लोब मनशा ॲग्रो प्रॉडक्टस तर्फे भागिदार दिपक वसंतराव कुंजीर, ईश्वरचंद किशोरीलाल गोयल, भूपेंद्रसिंग भवन सिंग, विकी घनशाम सुखवानी, विजय रमेश जसूजा यांचे मालकी हक्काची आहे.

| क्र. | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १ | १३२ | क्षेत्र ८–४२–५०<br>पोट खराबा २– ८१–५०<br>एकुण क्षेत्र ११–२४–०० | ७ रू.०० पैसे |
| २ | १४९ | क्षेत्र ९–०९–००<br>पोट खराबा १–२३–००<br>एकुण क्षेत्र १०–३२–०० | १० रू.७६ पैसे |
| ३ | १५ | क्षेत्र १५–६२–६०<br>पोट खराबा ७–५२–४०<br>एकुण क्षेत्र २३–१५–०० | १३ रू.०८ पैसे |
| ४ | १६९ | क्षेत्र ५–४१–५०<br>पोट खराबा २–८०–००<br>एकुण क्षेत्र ८–२१–५० | ४ रू.५२ पैसे |
| ५ | ३० | क्षेत्र ०–७७–००<br>पोट खराबा ०–२०–००<br>एकुण क्षेत्र ०–९७–०० | ० रू. ६२ पैसे |
| ६ | ३४ | क्षेत्र ०–४०–००<br>पोट खराबा ०–०५–००<br>एकुण क्षेत्र ०–४५–०० | ० रू.३४ पैसे |
| ७ | ६१ | क्षेत्र ८–०३–००<br>पोट खराबा २–२४–००<br>एकुण क्षेत्र १०–२७–०० | ६ रू.६८ पैसे |

२) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत हि ईश्वरचंद किशोरीलाल गोयल, भूपेंद्रसिंग भवन सिंग, मे. ग्लोब मनशा ॲग्रो प्रॉडक्टस तर्फे भागिदार दिपक वसंतराव कुंजीर, विकी घनशाम सुखवानी, विजय रमेश जसूजा यांचे मालकी हक्काची असुन त्यांनी मालकी हक्कासंबंधी आमचेकडे टायटल रिपोर्टची मागणी केलेली आहे.

३) सबब सदहू मिळकती संबधात कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणू द्याव्यात. वरील मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदर मालाकांचा मालकी हक्क स्वच्छ व निर्वेध आहे असे समजुन त्यांना तसे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे, हि नोटीस

तारीख – २१/०२/२०२४

सही/–
**अभिजित प्रकाश बागवे, ॲडव्होकेट,**
जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग
मोबाईल क्र. ९८५०२६८३५०

# भाजप नेते प्रसाद भोईर यांचा वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा

**नागोठणे : बातमीदार**



पेण सुधागड नागोठणे विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख प्रसाद भोईर यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून नागोठणे शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन भाजप नागोठणे यांनी केले होते. त्याचाच एक भाग म्हणून रविवारी (दि. १८) नागोठणे भाजप कार्यालय येथे आयुष्मान भारत कार्ड वाटपाचा कॅम्प लावला होता.

कॅमचे उद्घाटन प्रसाद भोईर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ नागरिक, महिला तरुण समाजातील विविध घटकांनी या सेवेचा लाभ घेतला. जवळजवळ दीडशे जणांना आयुष्मान कार्ड देण्यात आले. नागोठणे शहराध्यक्ष सचिन यांच्या सौजन्याने नागरिकांना निशुल्क आयुष्यमान भारत कार्ड देण्यात आले. वेळेअभावी सर्वच लोकांना कार्डचे वाटप करता न आल्याने हा कॅम्प पुन्हा एकदा लावण्याचे आश्वासन शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चालू केलेल्या या आयुष्यमान भारत कार्ड योजनेमध्ये रुग्णांना पाच लाख रुपयांच्या विमा भेटणार आहे. यानंतर नागोठणा आयटीआय कॉलेजसमोर प्रसाद भोईर यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाले. प्रसाद भोईर यांना शुभेच्छा देण्यासाठी विभागातील शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सचिन मोदी, सी राज पानसरे, आनंद लाड, श्रेया कुंटे, एकनाथ ठाकूर, अर्पणा सुट्टे, सोपान जांभेकर व भाजपचे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

## निवडक

### पनवेलमध्ये वृद्ध व्यक्तीला लुटले

**पनवेल :** शहरात पायी चालणाऱ्या ७१ वर्षीय वृद्ध महिलेला सोनसाखळी चोरट्यांनी लुटल्याची घटना घडली आहे.संबंधित वृद्ध महिला या नवीन पनवेल वसाहतीमधील सरकारी वसाहतीमध्ये राहतात. त्या त्यांचे भावासोबत पनवेल शहरातील पंचरत्न चौकातून पेडणेकर ज्वेलर्स सराफाच्या दूकानासमोरुन भाजीपाला घेऊन पायी चालत असताना दुचाकीवरुन आलेल्या दुकलीने पिडीत वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून तिथून पसार झाले. या घटनेनंतर पनवेल शहर पोलिसांनी अनोळखी चोरट्यांविरोधात ७५ हजार रुपये किमतीचे दागिने जबरी चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

### पानसरे यांच्याशी समस्यांवर चर्चा



**पनवेल :** नवी मुंबई परिमंडळ २ चे उप- आयुक्त विवेक पानसरे यांनी नुकताच पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांची अनेकांनी सदिच्छा भेट घेतली. त्यामध्ये प्रामुख्याने सचिव रायगड जिल्हा पोलीस पाटील संघ, करंजाडे पोलीस पाटील कुणाल लोंढे, प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी गौतम अहिरे, सुनील बनकर, आयु. दिगंबर साळवे, महादेव कांबळे, आर.डी. गमरे आदींनी उपायुक्त विवेक पानसरे यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. विविध विषयावर व नागरी समस्यांवर चर्चासुद्धा केली.

# शौचालयाचे मलमिश्रित पाणी रस्त्यावर

## तुर्भे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्वांत स्वच्छ शहर म्हणून बिरुदावली मिरवणाऱ्या नवी मुंबईतील सार्वजनिक शौचालयांचे वास्तव मोठे गंभीर आहे. एकीकडे शहर हागणदारीमुक्त करण्यासाठी पालिका उघड्यावर शौचास बसणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करत आहे, तर दुसरीकडे ज्या शौचालयांत जाण्याचे आवाहन पालिका करत आहे, ती शौचालयेच अत्यंत गलिच्छ स्थितीत असल्याचे समोर आले आहे. त्यात तुर्भे परिसरात ड्रेनेज लाईन नसल्याने शौचालयामधील घाणही गटारात सोडल्या आहेत.

शहरातील अनेक शौचालये बाहेरून चकाचक दिसतात. मात्र, पाणी नसणे, ठरलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करणे, त्यातच तुर्भे एमआयडीसी परिसरतील तुर्भे स्टोअर येथे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने शौचालये उभारण्यात आले आहेत, मात्र ड्रेनेज लाईन अभावी शौचालयाचा पुरता बोजवारा उडाला आहे, मात्र सध्या शौचालयाची सेप्टी टँक ओव्हर फ्लो होऊन शौचालयातील मलमिश्रित पाणी रस्त्यावर जमा होऊन परिसरात दुर्गंधी पसरली असल्याने रहिवाशांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. या मलमिश्रित पाण्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची शक्यता आहे.

स्वच्छ भारत अभियानादरम्यान शौचालयाच्या बाहेरील भिंतींवर मनपाने घोषवाक्य लिहित स्वच्छतेबाबत जनजागृती केली; तर दुसरीकडे दुर्लक्षितपणाचा नजारा आ वासून उभा राहिला आहे. याबाबत स्थानिक रहिवाशांनी मनपाकडे तक्रारीदेखील केल्या आहेत. हा प्रकार मागील काही दिवसांपासून सुरू असून याकडे मनपा प्रशासनाचे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सामाजीक कार्यकर्ते गोविंद साळुंखे यांनी केला आहे.

परिसर झोपडपट्टी बहुल असल्याने भले या ठिकाणी झोपड्या नाहीत पण दाटीवाटीने पक्की बैठी व दुमजली घरे आहेत. मलमिश्रित पाणी रहिवाशी वर्गाच्या घरा समोरून कायम वाहत असते तसेच हेच पाणी रहदारीच्या मार्गांवरूनदेखील वाहते त्यामुळे कायम या ठिकाणी दुर्गंधीयुक्त पाणी साचलेले पाहायला मिळते. या पाण्यामुळे परिसरातील नागरिकांना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागते. चार वर्षापूर्वी असाच प्रकार इंदिरा नगर परिसरातदेखील घडला होतो. त्यावेळी तेथील सार्वजनिक शौचालयाची सेफ्टी टँक ओव्हर फ्लो झाल्याने मालमिश्रित पाणी नागरी वस्तीमध्ये पसरले होते.

> **सार्वजनिक शौचालये मध्ये संबंधित चालकाकडून वेळोवेळी सफाई केली जाते. तसेच पाणी रस्त्यावर येत असेल तर त्वरित साफ सफाई केली जाईल.**
>
> **-भरत धांडे, सहाय्यक आयुक्त, तुर्भे विभाग**

विशेष म्हणजे तुर्भे परिसरात ड्रेनेज लाईन्स नसल्याने घरगुती व सार्वजनिक शौचालयांना सेप्टी टँकचा आधार घ्यावा लागतो. सेफ्टी टँक ज्यावेळी ओव्हर फ्लो होतात त्यावेळी मालमिश्रित घाण ही गटारातुन बाहेर फेकली जाते. विशेष म्हणजे या परिसरात असणारे रस्ते देखील ओबडधोबड असल्याने मलमिश्रित पाणी हे रस्त्यावर जमा होत असल्याचे गोविंद साळुंखे यांनी सांगितले.

## मिठापासुन साकारली शिवरायांची रांगोळी

**उरण : बातमीदार**



शिवरायांना मानवंदना म्हणून उरण तालुक्यातील पागोटे गावात शिव मावळ्यांनी मिठापासुन ३९ x २४ फुटाची छत्रपती शिवाजी महाराजांची रांगोळी साकारली आहे. रांगोळीसाठी ५५० किलो मिठ, ५५ किलो रंग, आणि १२ तासांचा वेळ लागला आहे.

रांगोळी काढण्यासाठी कलाकार नकुल पाटील, संतोष पाटील, पंकज पाटील, भावेश शेळके, दिपक निनावे, विशाल तांडेल, धिरज पाटील, छोटे कलाकार नक्ष पाटील, मंथन पाटील, यश पाटील, हर्षित पाटील, नेहाल जोशी, धैर्य पाटील, केतन मोहिते, साई पाटील, विर पाटील, दिव्यांशू पाटील, सक्षम पाटील, भुमीराज पाटील, सहाय्यक गणेश पाटील, विनय पाटील, हरिश्चंद्र पाटील, ऋषी भोईर, श्यामकांत मोकल (वेश्वी)या सर्वांनी विशेष मेहनत घेतली आहे.

रांगोळीमध्ये बंदुक व नांगर काढून भारतीय जवानांना व किसानांना अभिवादन केले असून कुलवाडी भूषण बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज अशी घोषणा दिली आहे. पागोटे गावातील तरूण दर वर्षी वेगवेगळी रांगोळी काढून शिवरायांना मानवंदना करतात. दरवर्षी काढण्यात येणारी रांगोळी ही सर्वांना प्रेरणा देणारी असते.

## मोहोपाड्यात रक्तदान शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अनंत विभुषित जगदगुरु नरेंद्राचार्यजी महाराज प्रणित स्व- स्वरूप संप्रदाय यांच्यावतीने १० ते २५ फेब्रुवारी दरम्यान महारक्तदान शिबिराचे आयोजन संप्रदायाच्यावतीने करण्यात आले आहे. त्याप्रमाणे तालुका सेवा समिती खालापूर यांच्यावतीने दुसरे रक्तदान शिबीर हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून मोहोपाडा येथील ग्रामपंचायत सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी ७१ रक्तदात्यांनी आपला रक्तदानाचा हक्क बजावला. मोहोपाडा येथील रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्यांना प्रशस्तिपत्र देण्यात आले. साई ब्लड बँक - पनवेल यांच्या ब्लड बँकेत रक्त संकलित करण्यात आले.

जगद्गुरू नरेंद्राचार्यजी महाराज संप्रदायाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. ज्यामध्ये ॲम्ब्युलन्स सेवा, महामार्गांवर होणाऱ्या अपघातात जखमी रुग्णांना वेळेत उपचार मिळावा, यासाठी ही सेवा मोफत आहे. शालेय शिक्षण नर्सरी ते १२ वी पर्यंत नाणीजधाम येथे गरजू विद्यार्थी यांना मोफत शिक्षण दिले जाते. आर्थिक दुर्बल घटकांना मदत, ब्लड इन निडअंतर्गत समाजातील गरजू लोकांना वेळेत रक्त मिळावे. यासाठी रक्तदान



शिबीरे घेऊन हे रक्त विनामूल्य दिले जाते, मरणोत्तर देहदान आतापर्यंत ५४ लोकांनी देहदान केले आहे.

या उपक्रमातून समाजात नवीन डॉक्टर तयार होऊन त्यांच्याकरवी समाज सेवा घडावी, असे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. मोहोपाडा येथील शिबिर यशस्वी करण्यासाठी खालापूर तालुका सेवा समितीने अथक परिश्रम घेतले.

## स्वच्छ सर्वेक्षणात नवी मुंबई पालिकेचे यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेने २०२३ सालात स्वच्छ सर्वेक्षणात डंका पिटला आहे. याबाबतची माहिती आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिली. २०२४ सालात यापेक्षा उत्तुंग यश मिळवण्याचा निश्चय केल्याचे सांगितले.

केंद्र सरकारच्या स्वच्छ सर्वेक्षणामध्ये नवी मुंबईने नेहमीच आपले मानांकन उंचावत ठेवले आहे. याही वर्षी २०२३ च्या स्वच्छ सर्वेक्षणात 'देशातील द्वितीय क्रमांकाच्या स्वच्छ शहराचे मानांकन' नवी मुंबई महापालिकेने संपादन केले आहे. त्यासोबतच कचरामुक्त शहराच्या 'गार्बेज फ्री' कॅटेगरीमध्ये नवी मुंबईने देशात सर्वोच्च 'सेव्हन स्टार मानांकन' प्राप्त केले आहे. असून असे मानांकन प्राप्त करणारे नवी मुंबई हे देशातील केवळ दोन शहरांमधील एक व राज्यातील एकमेव शहर आहे. ओडीएफ कॅटेगरीमध्येही नवी मुंबईने आपले सर्वोच्च 'वॉटर प्लस मानांकन' कायम राखले आहे

याशिवाय केंद्र सरकारच्या 'इंडियन स्वच्छता लीग' अंतर्गत 'नवी मुंबई इको क्नाईट्स' या नवी मुंबईच्या संघाने स्वच्छता लीगमध्ये सर्वोत्तम कामगिरी केलेली आहे. या लीग अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या ३ अभिनव उपक्रमांची विक्रमी नोंद 'बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्ड्स' मध्ये झालेली आहे.यामध्ये - १ लाख १४ हजाराहून अधिक नागरिकांनी शहरातील आठ विभागांत एकाच वेळी एकत्र येत 'स्वच्छता शपथ' घेतली, तसेच 'खारफुटी स्वच्छता मोहीम' राबविली. २६ हजारहून अधिक नागरिकांनी वंडर्स पार्क, नेरूळ येथे 'एका दिवसात स्वच्छतेची डिजीटल शपथ ग्रहण' केली. त्याचप्रमाणे 'स्वच्छ चित्रकला स्पर्धा' यामध्ये दोन लाख ८३ हजार १४४ विद्यार्थ्यांनी सहभागी होत राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला.

माझी वसुंधरा अभियान ३.०' मध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस 'क' वर्ग महानगरपालिकांमध्ये 'राज्यातील प्रथम क्रमांकाचे पर्यावरणशील शहर' म्हणून गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने 'राज्यस्तरीय शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धा' यामध्येही नवी मुंबई 'क' वर्ग महानगरपालिकांमध्ये प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली.यात आणखी एक महत्वाची बाब म्हणजे 'फिच' या आर्थिक मूल्यमापन करणा-या राष्ट्रीय मान्यताप्राप्त संस्थेच्या वतीने नवी मुंबई महानगरपालकेस सर्वोच्च 'डबल ए प्लस (एए+)' मानांकन सातत्याने आठव्या वर्षी मिळालेले असून ही नवी मुंबईच्या आर्थिक सक्षमतेवर उमटलेली नाममुद्रा आहे.

# कोमसापतर्फे राज्यस्तरीय काव्य स्पर्धा उत्साहात

**उरण : बातमीदार**

कोकण मराठी साहित्य परिषद उरणतर्फे १७ व १८ फेब्रुवारीदरम्यान एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूल द्रोणागिरी येथे १००वे कवी संमेलन, राज्यस्तरीय काव्य स्पर्धा, मधुबन कट्टा गौरव दिन, मान्यवरांचा सन्मान सोहळा, वाङ्मयीन पुरस्कार सोहळा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

काव्य स्पर्धेचे उद्‌घाटन कोमसापचे विश्वस्त रमेश किर यांच्या हस्ते झाले. कोमसाप अध्यक्ष नमिता किर, निलेश म्हात्रे, सदानंद गायकवाड, हसुराम म्हात्रे, रमेश थवई, शिक्षक पतपेढी पेण चेअरमन रवींद्र पाटील, संदेश गावंड, विकास पाटील, साहेबराव ओहोळ, सूर्यकांत दांडेकर, सुरेश ठाकूर, सदानंद गायकवाड आदी उपस्थित होते. पुरस्कार वितरण रायगड जिल्हा



कोमसाप अध्यक्ष सुधीर शेठ, जेष्ठ पत्रकार गणेश कोळी, संजय गुंजाळ, प्रकाश राजोपाध्ये, अविनाश जंगम, चंद्रकांत गायकवाड, प्रसाद पाटील, विकास पाटील, मनोज गावंड, किशोर कडू यांच्या हस्ते झाले.

संमेलन अध्यक्ष रायगड भूषण प्रा.एल.बी. पाटील, मधुबन कट्ट्याचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, कोमसाप उरणचे अध्यक्ष मछिंद्रनाथ म्हात्रे, मधुबन कट्टा अध्यक्ष भ. पो. म्हात्रे, कोमसाप उरण कार्याध्यक्ष रंजना केणी, सचिव अजय शिवकर, महिला प्रतिनिधी समता ठाकूर, जिल्हा प्रतिनिधी संजय होळकर तसेच कार्यकारिणी सदस्य किशोर पाटील, देविदास पाटील, भरत पाटील, रमण पंडीत, अनिल भोईर, संजीव पाटील, चेतन पाटील, दौलत पाटील, मीना बीस्ट, शिवप्रसाद पंडीत, मधुबन कट्टा सदस्य यांनी सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

काव्य स्पर्धेचे परीक्षण प्रा. ए. डी. पाटील, साहेबराव ठाणगे, इशान संगमनेरकर यांनी पाहिले.

स्पर्धेत खुलागट प्रथम वैशाली माळी पुणे, द्वितीय शिवप्रसाद पंडित उरण, तृतीय सिद्धेश लखमदे मुरूड, चतुर्थ प्रदीप वडदे नेरूळ, उत्तेजनार्थ अनिल भोईर उरण; कवी बंधू गटात प्रथम सुरेश शिंदे घणसोली, द्वितीय सुकुमार नितोरे वरळी, तृतीय मोरेश्वर बागडे ठाणे, उत्तेजनार्थ दत्ताराम म्हात्रे डोंबिवली, विक्रम जाधव ठाणे; महिला गट प्रथम संध्या दिनकर रोहा, द्वितीय हेमाली पाटील उरण, तृतीय स्वप्नाली देशपांडे बेलापूर, उत्तेजनार्थ अक्षदा गोसावी पनवेल, रेखा कुलकर्णी पुणे; रायगड कवी बंधू गट प्रथम अजय भोईर पेण, द्वितीय नागेश नायडू गोरेगाव मुंबई, तृतीय प्रवीण शांताराम पनवेल, उत्तेजनार्थ भरत पाटील उरण, मिलिंद कांबेरे मोहोपाडा; जीनवगौरव पुरस्कार कोकण ज्ञानपीठ विद्यालय प्राचार्य शामा, एनआय स्कूल प्राचार्य एल. एम. भोये, वीर वाजेकर फुंडे विद्यालय प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार, हभप भालचंद्र म्हात्रे; विशेष सन्मान जलतरणपट्टू मयंक म्हात्रे, चित्रकार प्रकाश पाटील, शॉर्टफिल्म मेकर तेजस पाटील, मिस महाराष्ट्र श्वेता राजकुमार यांना गौरविण्यात आले.

## ग्रंथोत्सवमध्ये 'मॉर्डन'च्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशीतील सेक्टर ६ येथे झालेल्या दोन दिवसीय ठाणे जिल्हा ग्रंथोत्सव २०२३ मध्ये मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.



महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालय आणि नवी मुंबई महापालिका यांच्या तर्फे साहित्य मंदिर सभागृहात २० व २१ फेब्रुवारी २०२४ रोजी हा ग्रंथोत्सव झाला. २० तारखेला सकाळी ९ वाजता महापालिका अतिरिक्त आयुक्त उपस्थित सुजाता ढोले, Affect स्कूल व कनिष्ट महाविद्यालयाच्या प्राचार्या सुमित्रा भोसले, डॉ. नरेंद्र पाठक (सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली) यांच्या उपस्थितीत ग्रंथदिंडी काढण्यात आली. या दिंडीत आणि ग्रंथोत्सवात मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.

# एमकेसीएल व सारथीतर्फे रायगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रात विविध किल्ल्यांच्या रुपात छत्रपती शिवाजी महाराजांचा एक अनमोल ठेवा आजही अस्तित्वात आहे. मात्र, ज्या ठिकाणाची माती कपाळाला लावली पाहिजे, तेथेच पर्यटकांनी कचऱ्याचे ढीग केलेले दिसून येत आहेत. पर्यटनासाठी गडकिल्ल्यांना भेटी देताना अनेक जण तेथे मोठ्या प्रमाणात कचरा करतात. प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्यांमुळे किल्ल्यांचे विद्रुपीकरण वाढते. दुर्गदुर्गेश्वर रायगड (किल्ले रायगड) येथे नुकतीच स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.



छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या., रायगड (एमकेसीएल) व सारथी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरदार हिरोजी इंदलकर किल्ले संवर्धन उपक्रम अंतर्गत' छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे रायगड विभागातील एमएस-सीआयटी व सारथी प्रशिक्षण संस्थेमध्ये सी.एस.एम. एस. डीप डिप्लोमा कोर्सचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेऊन उत्स्फूर्तपणे स्वच्छता मोहिमेस सुरुवात केली व कार्यक्रमाची सांगता रायरेश्वराचे दर्शन घेऊन करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सारथीचे सहसंचालक संदीप पवार, एम.के.सी.एल. कोंकण विभागीय समन्वयक मंगेश जाधव, एम.के.सी.एल. रायगड जिल्हा समन्वयक सिद्धेश गोसावी, विश्वास मते, माधव गोरे व सारथी प्रकल्पामध्ये काम करत असलेले केंद्र आस्क मी कॉम्पुटर माणगांव, शरयू कॉम्प्युटर एज्यूकेशन माणगांव, महाराष्ट्र इंस्टिट्यूट गोरेगांव, आयकॉन कॉम्पुटर म्हसळा, क्रिएटिव इंस्टिट्यूट श्रीवर्धन, सरस्वती कॉम्प्युटर एज्युकेशन बोर्ली, करिअर कॉम्पुटर महाड, समृद्धी कॉम्पुटर पोलादपूर या केंद्रांचे केंद्रचालक, केंद्र सहाय्यक व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे कार्य पाहून खासदार सुनील तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, रायगड महिला जिल्हाध्यक्षा उमा मुंडे तसेच गडावर पर्यटनास आलेल्या सर्वच पर्यटकांनी व सारथी अधिकाऱ्यांनी विद्यार्थांचे कौतुक केले.

## सत्याग्रह महाविद्यालयात शिवजयंती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सत्याग्रह महाविद्यालय खारघर नवी मुंबईच्या वतीने सुप्पारक भवन, सेक्टर - १९, खारघर, नवी मुंबई येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९४ जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पार्पण आणि दिपप्रज्वलन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दादा महाराज पनवेलकर यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात वेशभुषा, वादविवाद, वत्कृत्व, महात्मा फुले लिखित पोवाडा, गायनस्पर्धा झाली. संस्थेच्या सिध्दार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल, सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. दादामहाराज पनवेलकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवन आणि कार्यांचे मार्मिक भाषण केले.

प्राचार्या नेहा राणे आणि प्रा. संगिता जोगदंड



यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्त्री विषयक दृष्टिकोन आणि रयतेच्या कल्याणाची धोरणे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी माणसाने माणसाशी माणुसकीने वागण्याचा संदेश प्रजेला दिला, अशा महाशक्तिशाली सर्वगुण संपन्न लोककल्याणकारी छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व कलंकीत करण्याचे पाप कोणीही करु नये असे डोंगरगावकर म्हणाले. सुजाता भोसले, एम.एल. सुर्यवंशी, डॉ. निधी अग्रवाल, प्रमिला सणस, रत्ना नायर यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

# रोहा तालुक्यात बारावीच्या परीक्षा शांततेत

**रोहे : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या बारावी २०२४च्या परीक्षेला बुधवार (दि. २१)पासून सुरू झाली आहे. रोहा तालुक्यात चार केंद्रातून बारावीच्या कला, वाणिज्य, विज्ञान व एमसीव्हीसी या शाखेतून एकूण १६९६ विद्यार्थी बसले आहेत. परीक्षा केंद्राबाहेर सकाळी विद्यार्थी व पालकांची गर्दी दिसून आली.



परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी, सामाजिक संस्थांनी व पालकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. परीक्षा केंद्रावर अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त होता.

## एकूण १६९६ विद्यार्थी; परीक्षा केंद्रांवर चोख बंदोबस्त

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणारे बारावीची लेखी परीक्षा बुधवारपासून सुरू झाली आहे. वर्षभर मेहनतीने अभ्यास विद्यार्थ्यांनी केला असून त्याचे अंतिम परीक्षा बारावीची कला, वाणिज्य, विज्ञान व एमसीव्हीसी या शाखेची सुरू झाली असून रोहा तालुक्यात विज्ञान शाखेत ९१२ विद्यार्थी, कला शाखेत ३२३ विद्यार्थी, वाणिज्य शाखेत ४१५ विद्यार्थी, एमसीव्हीसी शाखेत ४६ विद्यार्थी असे एकूण १६९६ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत.

ही परीक्षा रोहा तालुक्यात चार केंद्रात चालू असून यामध्ये रोहा केंद्रात ४५१ विद्यार्थी, कोलाड केंद्रात ५१३, विद्यार्थी चिंचवली केंद्रात २८५, नागोठणे केंद्रात ४४७ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. रोहा तालुक्यात चालू असलेल्या बारावी परीक्षेच्या परीक्षक म्हणून गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, उपपरीक्षक किशोर पोळेकर यांच्या देखरेखेकाली चालू आहेत.

# खारगाव येथे श्री भवानी देवी उत्सव उत्साहात



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहे तालुक्यातील खारगाव येथील ग्रामदैवत श्रद्धास्थान श्री भवानी देवीचा वार्षिक उत्सव व भव्य दिव्य पालखी सोहळा मंगळवारी (दि. २०) मोठ्या उत्साही वातावरणात झाला. यानिमित्त अभिषेक व श्री भवानी देवीची पूजा आरती, नैवैद्य आदी धार्मिक विधी त्याचबरोबर महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ, खारगाव येथील स्थानिक हभप उदय महाराज बंद्रि यांची पुष्पवृष्टीपर कीर्तनरुपी सेवा झाली.

फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये बेंजो, खालू बाजाच्या गजरात हरिनामाच्या जयघोषामध्ये श्रीभवानी मातेची देवीची घोषणा करीत, संपूर्ण गावात पालखी मिरवणूक काढण्यात आली. गावात ठिकठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. पालखी सोहळा यशस्वीतेसाठी जय भवानी ग्रामस्थ मंडळ, जय भवानी युवक मंडळ, जय भवानी महिला मंडळ तसेच जय भवानी प्रासादिक भजन मंडळ खारगाव यांनी अथक परिश्रम घेतले.

# शिवजयंती उत्सवाला मोठे स्वरूप प्राप्त व्हावे -ना. आदिती तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

शिवसमर्थ नगरच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त येथील लोकांचा एकोपा व आनंदी वातावरण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सण, उत्सवाप्रमाणेच साजरी करीत असल्यामुळे मला अभिमान आहे. येत्या काळात याच शिवसमर्थ नगरच्या मंडळाला मोठे स्वरूप येत राहवे आणि येथील शिवजयंती उत्सवालाही मोठे स्वरूप प्राप्त व्हावे, अशी महाराज चरणी प्रार्थना करते, असे प्रतिपादन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी केले.



शिवसमर्थ ग्रामविकास मंडळ शिवसमर्थ नगर महादेववाडी यांच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा व वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे व रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे हस्ते शिवप्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, ज्येष्ठ नागरिक सत्कार करण्यात आला.

जिल्हाध्यक्ष सुरेश मगर यांनी, शिवसमर्थ नगर महादेववाडी येथे सर्व जातीधर्मियांनी एकत्रित रहणे वाखाणण्याजोगे आहे, असे सांगितले. ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा राष्ट्रवादी सरचिटणीस सुरेश मगर, रोठ बु. माजी सरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, वाशी उपसरपंच अरविंद मगर, तंटामुक्ती समिती अध्यक्ष चंद्रकांत भगत, मंडळाचे अध्यक्ष रत्नाकर चव्हाण, उपाध्यक्ष संदीप मगर, प्रज्योत गुरव, सेक्रेटरी जगदीश जाधव, दीपक डफळ, खजिनदार सुनील जाधव, सदस्य निलेश देशमुख, सुरेश पाटील, अविनाश जंगम, रवींद्र जंगम, प्रशांत देशमुख, जगन्नाथ मोहिते, प्रतिक घाग, अक्षय बामणे, दीपक साळुंखे, उमेश साळुंखे, रोहित मगर, लक्ष्मण माने, यांसह महिला मंडळ या वेळी उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

सालाबादाप्रमाणे मुरूड जंजिरा नगर परिषद व शिवजयंती उत्सव समितीतर्फे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. शिवजयंती उत्सवानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रशासकीय अधिकारी दीपाली दिवेकर यांनी भूषविले.

व्यासपीठावर माजी नगरसेवक प्रमोद भायदे, माजी सभापती पांडुरंग आरेकर, माजी नगरसेविका युगा ठाकूर, संजीवनी आरोग्य संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, शिवसेनेचे शहरप्रमुख आदेश दांडेकर, प्रेरणा चौलकर आदी उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना नगर परिषद व पद्मदुर्ग जागर संस्थेतर्फे प्रशस्तीपत्र व रोख बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेत इ. पहिली ते चौथी प्रथम वेदिका संदेश भोसले, द्वितीय चिन्मयी गणेश मिस्त्री, तृतीय हर्षाली नरेश भोईर; इ. पाचवी ते सातवी प्रथम विदिशा दत्तात्रय म्हात्रे, द्वितीय दुर्वेश प्रमोद तांबडकर, तृतीय काव्या किशोर माळी; इ. आठवी ते दहावी प्रथम सान्वी प्रशांत गुंजाळ, द्वितीय सृष्टी संजय भगत, तृतीय श्रावणी संजय भगत; इ. ११वी ते १५वी प्रथम रोशनी रवींद्र म्हात्रे, द्वितीय रिद्धी राजेश भगत, तृतीय सुजल देवेंद्र गायकर यांनी यश मिळविले. उल्लेखनीय बाब म्हणजे ओवी मनोज पुलेकर व ज्ञानदा रतिश रणदिवे या दुसरीतील चिमुरड्या मुलींनी उस्फूर्त भाषणे करून उपस्थितांची विशेष दाद मिळवली.





# रोहा सांगडे येथील तलावाचे काम सुरू



**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामपंचायत मालसई येथील सांगडे गावातील पुरातन तलाव्याच्या साफसफाई, खोली, सुशोभीकरणासह विविध प्रकारच्या कामांना धाटाव औद्योगिक क्षेत्रातील एक्सल कंपनीच्या माध्यमातून श्री विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर व तंत्रज्ञान व्यवस्थापन विभाग यांच्या सहकार्याने सुरुवात करण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ नेते खेळु ढमाल, एक्सल कंपनीचे मॅनेजर हशीराम मंचेकर, सुशील रेळेकर, प्रसाद आग्री, संदीप भोकटे, पुरुषोत्तम मोरे, स्वप्नील दिवेकर,गणपत कुर्ले, सतिश मोरे, अजय लहाने, अलंकार लहाने, मयुर दिवेकर, दिपक भोई, राहुल पवार, श्रवण भोकटे, मंगेश ढमाल, निखील मोरे, भावेश मोरे, सुरज भोई, महेश तुपकर, मारुती तुपकर, सचिन जांभुळघरे आदी उपस्थित होते.

कंपनीचे मॅनेजर हशीराम मंचेकर, सुशील रेळेकर व प्रसाद आग्री यांच्या प्रयत्नातून गणपती विसर्जन, घाट, तलावाचे सुसभीकरण, साफसफाई, खुदाई यंत्राच्या माध्यमातून जलद गतीने सुरू करण्यात आले आहे. त्याचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ज्येष्ठ नेते खेळू ढमाले यांनी एक्सेल कंपनी व्यवस्थापनाचे आभार मानले.

# घोसाळेगडावर स्वच्छता, शिवविचार मोहीम उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील घोसाळेगडावर स्वच्छता मोहीमेसह वैचारिक प्रबोधनाचे आयोजन शिवऊर्जा मित्र मंडळाने केले. या वेळी गडभ्रमंती, गडाची पूजा करण्यात आली. शाहीर नितीन सोलंकी यांनी शिवगायनातून उपस्थितांत ऊर्जा आणली. पुरातत्व विभागाचे अधिकारी जी. बी. येळीकर यांनी गडसंवर्धन व गड डागडुगीसंदर्भात मार्गदर्शन करून शिवभक्तांना गडाच्या दुरूस्तीबाबत आश्वासित केले.



स्वच्छता मोहीम व शिवविचार कार्यक्रमात प्राणीमित्र कुमार देशपांडे यांसह अनेक सेवाभावी संस्था, मान्यवरांचा सन्मान केला. या वेळी पोलीस निरीक्षक देवीदास मुपडे, गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, पत्रकार स्नेहल पाटकर, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जाधव, रोटरी क्लबचे सुरेंद्र निंबाळकर, प्राणीमित्र कुमार देशपांडे, रेंटेललाईफचे प्रथमेश शिर्के, अध्यक्ष समीर दळवी, अनिकेत दांडेकर, शाहीर नितीन सोलंकी आदी उपस्थित होते. शिवऊर्जा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गडाची स्वच्छता केली.

त्यानंतर सर्व शिवप्रेमी, बालगोपाळ यांनी गडाची भ्रमंती केली. स्नेहल पाटकर यांनी शिवप्रेमींना गडाची माहिती दिली. या वेळी गडपूजन करण्यात आले.

पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, राजेंद्र जाधव यांनी उपस्थितांचे प्रबोधन केले. शिवऊर्जा मित्र मंडळाचे अभ्यासक समीर दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष निलेश भांबर, दिप्रेश सावंत, किरण बेंडखळे, सचिन दळवी, सुरेश कोरपे, तन्मय सानप, नितीन सोलंकी, अरुण साळुंखे व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### गडाच्या डागडुजीला वेग येण्याची अपेक्षा

घोसाळगडावर शिवजागर कार्यक्रमाला पुरातत्व विभागाचे अधिकारी जी. बी. येळीकर उपस्थित राहिल्याने शासकीय पातळीवर गडाच्या डागडुजी कामाकडे लक्ष वेधले जाणार आहे. ग्रामस्थांनी गड दुरूस्तीबाबत अनेक निवेदन, पत्रे दिली आहेत. त्या शिवकार्याला प्रारंभ होईल, असे मत राजेंद्र जाधव यांनी व्यक्त करून समाधान व्यक्त केले.

# माणगावमधील शिबिरात १६१ बॅगा रक्त संकलित

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेच्या वतीने केईएम रुग्णालय परेल यांच्या विशेष सहकार्याने सोमवारी (दि.१९) महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १६१ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या. शिबिराचे उद्‌घाटन माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, नगरध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी केईएम रुग्णालयाचे समाज विकास अधिकारी डॉ. प्रकाश सावंत, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील,ॲड. राकेश पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, माजी सभापती संगीता बक्कम, पाणीपुरवठा सभापती प्रशांत साबळे, स्वच्छता सभापती शर्मिला सुर्वे, महिला व बालकल्याण समिती सभापती सुविधा खैरे, नगरसेविका रश्मी मुंढे, उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, माणगाव मेडिकोज अध्यक्ष डॉ. अभिजित मेहता, डॉ. गौतम राऊत, उपनराध्यक्ष राजेश मेहता, माजी पाणीपुरवठा सभापती कपिल गायकवाड, माजी स्वच्छता सभापती दिनेश रातवडकर, नगरसेवक अजित तारळेत्रत्रकर, सामाजिक कार्यकर्ते रामनारायण मिश्रा, युवाउद्योजक सुभाष गुगळे, रोटरी क्लब अध्यक्ष बिपीन दोशी, स्वीकृत नगरसेवक सिराज परदेशी, व्यापारी असोशिएशनचे लक्ष्मण दळवी, प्रदीप गांधी, प्रदीप नाईक आदींनी भेट दिली. सर्व १६१ रक्तदात्यांना प्रमाणपत्र, मेडल देण्यात आले.



## निवडक



### चौकमध्ये शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन

**चौक** : छत्रपती शिवाजी महाराजांची ३९४वी जयंती साजरी करताना चौक येथील शिवप्रेमी मित्र मंडळ यांनी शौर्य गाथा इतिहासाची या माध्यमातून शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन आयोजित केले होते. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज कोणते शस्त्र कधी वापरायचे, कोणत्या शस्त्राचा उपयोग कधी व केव्हा करायचा याबाबत विशेष माहिती दिली. या प्रदर्शनास चौक सरपंच रितु ठोंबरे, संजय कोंडीलकर, प्रशांत आंबवने, शिवप्रेमी, विद्यार्थी यांनी भेट देऊन शिवकालीन शस्त्रांची माहिती घेतली. याच वेळी एमजीएम हॉस्पिटल कामोठे पनवेल यांच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सुमारे ५३ शिवप्रेमींनी रक्तदान केले.

### ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थ्यांचा सत्कार



**रोहे** : तालुका बुरुड समाजाचा मेळावा धाटाव ग्रामपंचायतीमधील भाईसाहेब पाशिलकर सभागृहात पार पडला. या मेळाव्यात समाजातील ज्येष्ठ नागरिक व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मेळाव्यानिमित्त हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जिल्हा माजी अध्यक्ष संदेश नागे, जिल्हाध्यक्ष रुपेश जामकर, राजेश मोरे, राजेश खैरे, सुदीन सावंत, दीपक गायकवाड, जितेंद्र महाले, जिल्हा कार्याध्यक्ष प्रशांत जाधव, महेंद्र सोनावले, रिद्धी मोरे, सुवर्ण रटाटे, तालुकाध्यक्ष मंगेश सोनावले, रमेश सुर्वे संजय गायकवाड, समीर शिंदे, विशाल सोनकर, ज्योती नागे, पूजा जाधव, समाज बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी साळुंखे यांनी तर आभार प्रशांत जाधव यांनी मानले.

### उसरोलीमध्ये कलाकारांचा सत्कार

**मुरूड** : ग्रुप ग्रामपंचायत उसरोलीमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सरपंच महेशकुमार पाटील यांच्या हस्ते शिवपुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिवजयंतीनिमित्त स्थानिक कलावंत गोरख कुमरोटकर, शंकर राऊत, नरेश भेर्ले, दामोदर थळे, कृष्णा गुंड, बाळकृष्ण वाडकर, विलास भुरे, विद्याधर चोरघे आदी भजनी बुवांचा सत्कार सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी भाषणे सादर करण्यात आली. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य नवनाथ तांबोळी, शैलेश पाटील, संकेश पाटील, वृषाली नवघरकर, कल्पना म्हशिलकर, निकिता कोर्लेकर, मुरूड राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष फैरोज घलटे, विद्याधर चोरघे, माजी सरपंच शरद कुमरोटकर, सामाजिक कार्यकर्ते विनायक नवघरकर, शैलेश गुंड, सज्ञाद हसवारे, शांताराम मानकर, प्रशांत महाडिक, गोपीचंद बाजी, सिद्धेश बेडेकर, ग्रामसेविका चित्रा पेढवी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका उपस्थित होते.

### शिरवली येथे समरसता यज्ञ

**माणगाव** : शिरवली येथे गोडसे कुटुंबियांकडून विष्णुबुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राला ६.३ गुंठे जमीन दान मिळाली आहे. या ठिकाणी सामाजिक समरसता यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त श्रद्धा भाटे (महाड) यांचे विष्णुबुवांचे चरित्र आणि कार्यावर सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले होते. यज्ञाचे पौरोहित्य विक्रम विनायक वेद पाठशाळा, रेवदंडा यांचे प्रमुख आचार्य अजय शर्मा गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी शिशिर मुळी गुरुजी, अक्षय लिब्दे गुरुजी आणि सात विद्यार्थ्यांनी केले. यज्ञ कार्याचे यजमान वसंतराव पोळेकर आणि प्रतिभा पोळेकर होते. यज्ञामध्ये आहुती देण्यासाठी शिरवली पंचक्रोशीतील सर्व समाजातील बांधवांनी सहभाग घेतला. स्वरूपवर्धिनी, पुणे यांचे कार्यवाह विश्वासराव कुलकर्णी, डीआरडीओचे माजी डेप्युटी डायरेक्टर डॉ. सुहास काणे उपस्थित होते.



### पेण येथे महारक्तदान शिबिर

**पेण** : नरेंद्रचार्य महाराज संस्थान पेण यांच्यातर्फे महारक्तदान शिबिराचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय येथे करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन रुपेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले होते. तालुक्यात एकूण आठ ठिकाणी रक्तदान शिबिर झाले. त्यात एकूण ७२५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. एमजीएम हॉस्पिटल ब्लड बँक यांच्याकडे हे रक्त संकलित केले जाणार आहे. या कॅम्पचे प्रमुख राजेश आत्तिर्डे, पेण तालुका प्रमुख किरण म्हात्रे, तालुका युवा प्रमुख उपेश पाटील, ब्लड इन नीड प्रमुख प्रणित माळी तसेच रवींद्र आहेर, संजय पाटील, रवींद्र भोईर, जयवंत घरत, प्रकाश भोईर यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



# विरारच्या हार्दिक पाटीलचा अमेरिकेत डंका

## अल्ट्रामॅन स्पर्धा विक्रमी वेळेत पूर्ण






**वसई : प्रतिनिधी**

विरारच्या हार्दिक पाटील याने अमेरिकेत झालेली अल्ट्रामॅन फ्लोरिडा २०२४ स्पर्धा ही विक्रमी वेळेत पूर्ण करून आणखी एका विक्रमाची नोंद केली आहे. ३१ तास ४६ मिनिटांत त्याने ही तीन दिवसांतील स्पर्धा पूर्ण केली. ही स्पर्धा पूर्ण करणारा हार्दिक १९वा भारतीय खेळाडू ठरला आहे.

दरवर्षी अमेरिकेत अल्ट्रामॅन स्पर्धा ही तीन दिवस आयोजित केली जाते. त्यात १० किमी जलतरण, ४२० किमी सायकलिंग आणि ८५ किमी धावण्याचा समावेश असतो. या स्पर्धेत दिवसाला १२ तासाप्रमाणे खेळाडूंना ही स्पर्धा पूर्ण करायची असते. यंदाची स्पर्धा ९ ते ११ फेब्रुवारी या कालवाधीत अमेरिकेच्या फ्लोरिडा शहरात पार पडली.

या स्पर्धेत १७ देशातील ४८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. त्यात सहा भारतीय स्पर्धक सहभागी झाले होते. भारतातील केवळ चार स्पर्धकच ही स्पर्धा पूर्ण करू शकले. हार्दिक पाटील याने ३१ तास ४६ मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण केली.

हार्दिकेने पहिल्या दिवशी ४ तास ५ मिनिटांत स्विमिंग आणि ५ तास २० मिनिटांत १४५ किमी सायकलिंग पूर्ण केली. दुसऱ्या दिवशी १० तास ४५ मिनिटांता २७५ किमी सायकलिंग तर तिसऱ्या दिवशी ११ तास १० मिनिटांत ८५ किमी धावण्याचे अंतर पार केले. तीन दिवसांत विक्रमी वेळेत स्पर्धा पूर्ण करणारा हार्दिक हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. स्पर्धेच्या इतिसाहात आतापर्यंत केवळ १८ भारतीयांनीच ही स्पर्धी पूर्ण केली होती.

यापूर्वी हार्दिकने जगभरात आर्यनमॅन स्पर्धा तसेच जागतिक मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेऊन अनेक विक्रमांची नोंद केली आहे. इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आठ वेळा, वर्ल्ड रेकॉर्ड इंडियामध्ये चार वेळा आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये ६ वेळा नोंद केली आहे.

## केएल राहुलनंतर आता बुमराह चौथ्या कसोटीतून बाहेर

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

केएल राहुल दुखापतीमधून सावरला नसल्यामुळे इंग्लंडविरोधातील चौथ्या कसोटी सामन्याला तो मुकणार आहे. त्याशिवाय जसप्रीत बुमराहसुद्धा चौथ्या कसोटी सामन्यात खेळणार नाही. बीसीसीआयने केएल राहुल आणि जसप्रीत बुमराह यांच्याबद्दलचे अपडेट दिले आहे.

भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच कसोटी सामन्यातील तीन सामने झाले आहेत. इंग्लंडने पहिल्याच कसोटी मालिकेत विजय मिळवत शानदार सुरुवात केली, पण त्यानंतर रोहितच्या नेतृत्वातील भारतीय संघाने जोरदार पलटवार दिला. विशाखापट्टणम आणि राजकोट कसोटी जिंकत भारताने मालिकेत आघाडी घेतली. आता शुक्रवारी (दि.२३) रांची येथे चौथी कसोटी सामना होणार आहे. जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत वेगवान गोलंदाजीची धुरा मोहम्मद सिराजच्या खांद्यावर असेल.

### प्रकाश पुराणिक स्मृती चषक महिला टी-२० क्रिकेट

## शर्वी सावेच्या झंझावाती शतकामुळे पीडीटीएसएचा विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

शर्वी सावेच्या ६० चेंडूंतील १०२ धावांच्या झंझावाती खेळीच्या जोरावर पालघर डहाणू तालुका स्पोर्ट्स असोसिएशनने (पीडीटीएसए) प्रकाश पुराणिक स्मृती चषक महिला टी-२० क्रिकेट स्पर्धेत फोर्ट यंगस्टर्सचा १५ चेंडू आणि ७ विकेटनी सहज विजय मिळविला, तसेच रिगल, व्हिक्टरी आणि भारत या क्रिकेट क्लबनेही विजयासह स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

महिला क्रिकेटला प्रोत्साहन देण्यासाठी मुंबई क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने माहिम ज्युवेनाईल स्पोर्ट्स क्लब आणि शिवाजी पार्क जिमखान्याने संयुक्तपणे आयोजित केलेल्या या स्पर्धेत क्रिकेटप्रेमींना छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात



महिला क्रिकेटपटूंची फटकेबाजी पहायला मिळाली. डहाणू तालुक्याच्या शर्वी सावेने १५ चौकारांची बरसात करीत ६० चेंडूत १०२ धावा काढल्या. फोर्ट यंगस्टर्सच्या १४५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना शर्वीने अश्विनी निशादसह चौथ्या विकेटसाठी ९३ धावांची अभेद्य भागी रचत संघाला १८व्या षटकांतच विजय मिळवून दिला.

दुसऱ्या एका सामन्यात केतकी धुरेच्या ३७ चेंडूतील ६५ धावांच्या नाबाद खेळीमुळे भारत क्रिकेट क्लबने ४ बाद १३७ अशी मजल मारली होती तर अक्षी गुरवच्या ९ धावांत टिपलेल्या ३ विकेटमुळे माटुंगा जिमखान्याचा डाव अवघ्या ४० धावांतच आटोपला आणि भारतने ९७ धावांचा मोठा विजय मिळविला. त्याचप्रमाणे सारिका कोळीच्या ८६ आणि मानसी तिवारीच्या ६९ धावांमुळे व्हिक्टरी क्लबने ६ बाद २०२ असा धावांचा डोंगर उभारला.

प्रत्युत्तरादाखल बोरीवली क्रिकेट क्लबचा संघ अलीशा खानच्या मार्यापुढे ७१ धावांतच कोसळला आणि व्हिक्टरीने १३१ धावांच्या दिमाखदार विजयाची नोंद केली. रिगल क्रिकेट क्लबनेही महाराष्ट्र यंग क्रिकेटर्सचे ९४ धावांचे माफक लक्ष्य १४.१ षटकांत३ फलंदाजांच्या मोबदल्यात गाठले.

## राज्यस्तरीय गोशिन रियु कराटे स्पर्धेत विद्यार्थ्यांचे सुयश




**उरण : बातमीदार**

शितो रीयू कराटे असोसिएशनतर्फे राज्यस्तरीय कराटे स्पर्धा अलिबाग येथे घेण्यात आली होती. यामध्ये गोशीन रियू कराटेच्या विद्यार्थिनींनी विविध वजनी गटात पदके पटकावली.

वेदा पाटील गोल्ड मेडल, ह्रदवी म्हात्रे एक गोल्ड मेडल एक सिल्वर मेडल, दीक्षांत उबाळे एक ब्राँझ मेडल, श्रेयश कांबळे एक गोल्ड मेडल, दिव्या भारद्वाज दोन ब्राँझ मेडल, हीर सेन एक गोल्ड एक एक ब्राँझ मेडल, प्रत्युषा पाटील एक सिल्वर मेडल, प्रसिद्धी आल्हाद दोन गोल्ड मेडल, मनस्वी कोळी दोन गोल्ड मेडल, साईश वाल्मिकी एक सिल्वर एक ब्राँझ मेडल, अनय पाटील गोल्ड मेडल एक सिल्वर मेडल,वेदा ठाकरे दोन गोल्ड मेडल ही पदके पटकावली. मनस्वी कोळी हिला बेस्ट फायटर किताब देण्यात आला.


एकूण ११ गोल्ड मेडल, चार सिल्व्हर, पाच ब्राँझ पदक खेळाडूंनी मिळविली. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातून ३५० विद्यार्थी आले होते. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून सिहाल राजू कोळी, इंडिया प्रेसिडेंट, गोपाळ म्हात्रे, परेश पावसकर, अमिषा घरात, अमिषा घरात, सुलभा कोळी यांनी केले.

## राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत युवान, सप्तशीचे यश

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय एंडोरन्स स्केटिंग स्पर्धा २०२३-२४ ही नुकतीच खोपोलीमध्ये पार पडली. यामध्ये युवान पाष्टे (वय ५) आणि सप्तशी सावंत (वय ७) यांनी स्केटिंगमध्ये तीन ब्राँझ मेडल जिंकत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत बाजी मारली आहे. अनुक्रमे पाच वर्षांखालील आणि सात वर्षांखालील वयोगटात या दोघांनी राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे.

या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी सात राज्यातील सर्व गटांतून एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये महाराष्ट्रासह, तामिळनाडू, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यातील खेळाडू सहभागी झाले होते.



मुंबईतील स्केटलाईट अकादमीचे संस्थापक आणि प्रशिक्षक संदीप माने आणि विनोद माने यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेतून भारतातून २०० खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली असून एकूण ६०० खेळाडूंमध्ये ही स्पर्धा होणार आहे. मे २०२४मध्ये श्रीलंका येथे ही स्पर्धा होणार आहे. या दोघांनाही त्यांच्या आई आणि वडिलांचे प्रोत्साहन मिळत असल्याने ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले आहेत.

## राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट फेडरेशन कप स्पर्धेत अनुज सरनाईकला सुवर्णपदक

**पाली : प्रतिनिधी**

नांदेड येथे राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट फेडरेशन कप स्पर्धा नुकतीच पार पडली. यास्पर्धेत फाईट प्रकारामध्ये ८५ ते ९० किलो वजनी गटात पालीतील अनुज सरनाईकने सुवर्णपदक पटकावले.

इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मान्यतेने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशने सातवा पिंच्याक सिलॅट फेडरेशन कप २०२३-२४, पहिली ऑल इंडिया पिंच्याक सिलॅट चम्पियनशिप २०२३-२४ (सर्व वयोगट) स्पर्धा श्री गुरू गोविंद सिंग स्टेडियम परिसर नविन इंडोर हॉल, नांदेड येथे आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये विविध राज्यातील ७०० खेळाडू सहभागी झाले होते.

या राष्ट्रीय स्पर्धेचे उद्घाटन श्रीसंत बाबा बलविंदर सिंघजी गुरुद्वारा लंगर, महानगराध्यक्ष भाजप महिला मोर्चा श्रद्धा सुशीलकुमार चव्हाण, जंगी मराठवाडा प्रमुख महिला मोर्चा अल्पसंख्याक मनमोहन कौर, पिंच्याक




सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवल इंडियन, कॉम्पिटीशन डायरेक्टर इरफार अजीज बुट्टा, कार्यकारी अधिकारी इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन मोहोम्मद इकबाल, महासचिव तारीख अहमद झरगर यांच्या उपस्थितीत झाले. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

## यशस्वी जैस्वाल अष्टपैलूंच्या क्रमवारीत अव्वल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत २-१ असी मुसंडी मारली आहे. युवा फलंदाज यशस्वी जैस्वालने राजकोट कसोटीत कारकीर्दितील दुसरे द्विशतक साजरे केले आणि आयसीसी क्रमवारीत त्याने थेट १५वे स्थान पटकावले. कसोटी कारकीर्दितील यशस्वीची ही सर्वोत्तम क्रमवारी आहे.

भारताचे चार खेळाडू आता फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल १५मध्ये आहेत. यामध्ये विराट कोली (सातवा), रोहित शर्मा (१२) आणि रिषभ पंत (१४) यांचा समावेश आहे. न्यूझीलंडचा महान फलंदाज केन विलियम्सन अव्वल स्थान टिकवून आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत विलियम्सनने मॅच विनिंग शतक झळकावले होते. इंग्लंडचा सलामीवीर बेन डकेट १२ क्रमांकाच्या सुधारणेसह १३व्या स्थानी आला आहे. भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजा या क्रमवारीत सात स्थानवर सरकून ३४व्या क्रमांकावर आला आहे आणि दक्षिण आफ्रिकेचा डेव्हिड बेडिंगहॅम (२९ स्थान वर) ५०व्या क्रमांकावर पोहचला आहे.

भारताचा अनुभवी फिरकीपटू आर अश्विन (२) हा अव्वल स्थानावर विराजमान असलेल्या जसप्रीत बुमराहच्या जवळ पोहोचला आहे. राजकोट कसोटीत त्याने ५०० विकेट्सचा टप्पा ओलांडला. अष्टपैलू रवींद्र जडेजाने राजकोट कसोटीत पाच विकेट्स घेतल्या आणि तो गोलंदाजांच्या क्रमवारीत सहाव्या स्थानी आला आहे.

जडेजाने त्या कसोटीत शतक व एकूण सात विकेट्स घेतल्या होत्या आणि तो अष्टपैलूंच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर विराजमान झाला आहे.

## महाराष्ट्राचे मर्द मावळे स्पर्धेत मार्शल आर्ट खेळाडूंना मानाची ढाल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मर्द मावळे या नावाने भारत देशात व महाराष्ट्र राज्यात प्रथमता एक वेगळे विचार व इतिहासामधून प्रेरणा घेऊन राज्यस्तरीय कराटे, ताइक्कांडो मर्दानी व मार्शल आर्ट स्पर्धेचे आयोजन तालुका क्रीडा संकुलात करण्यात आले होते. या स्पर्धेत मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोवाइडरच्या खेळाडूंनी सर्वाधिक पदके मिळवित मानाची ढाल पटकाविली.

स्पर्धेमध्ये कराटे, ताइक्कांडो, मर्दानी हे तीन खेळ समाविष्ट होते. वेगवेगळ्या जिल्ह्यातून व क्लासेसमधून आलेल्या सर्व खेळाडूंनी आपल्या कलेचे अतिशय उत्कृष्ट आणि साहसपूर्ण प्रदर्शन केले.

स्पर्धेचे वेगळेपण म्हणजे जिंकणाऱ्या प्रत्येक खेळाडूस शिवकालीन राजमुद्रेवर आधारित पदक देण्यात आले. सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या एक मुलास व एक मुलीस चांदीचे कड म्हणून सन्मानपूर्वक भेट देण्यात आले. सर्वोत्कृष्ट प्रदर्शन करीत सर्वांत जास्त पदक जिंकणाऱ्या संघास छत्रपती शिवाजी




महाराज यांचे मावळे ज्या धातूची ढाल वापरत होते त्याच पद्धतीची ढाल ही मानाची ढाल म्हणून देण्याचे योजिले.

मुलांमधून तिलक हिरा घरती (हिरा तायक्वांदो अकॅडमी नवी मुंबई) व मुलींमधून आयुषी सचिन माने (इंडिया ब्लॅक बेल्ट असोसिएशन व भूपेंद्र मार्शल आर्ट ट्रेनिंग प्रोव्हायडर) या दोन खेळाडूंनी सर्वोत्कृष्ट प्रदर्शन केल्यामुळे त्या दोघांनाही चांदीचे मानाचे कडे व मावळा पगडी तसेच छत्रपती शंभू राजांची प्रतिमा सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले. तिलक घरती या मुलास महाराष्ट्राचा मर्द मावळा व आयुषी माने या मुलीस महाराष्ट्राची शूर मर्दानी असे संबोधून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेमध्ये सर्वांत जास्त पदके म्हणजेच ४१ सुवर्णपदक, २७ रौप्यपदक, १३ कांस्यपथक हे भूपेंद्र शिवाजी गायकवाड यांच्या संघाने जिंकले. या संघात सीकेटी महाविद्यालय खांदा कॉलनी व एसएमडीएल महाविद्यालय कळंबोली येथील मार्शल आर्ट ॲक्टिव्हिटी शाखेच्या खेळाडू होते. संघाला ग्रँडमास्टर सी. एल. बिंद यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे आयोजन इंडिया ब्लॅक बेल्ट संघटनेचे संस्थापक महाराष्ट्र राज्य टेक्निकल डायरेक्टर भूपेंद्र गायकवाड आणि डायनेमिक यूथ स्पोर्ट्स अकादमीचे संस्थापक जयेश दत्तात्रय चोगले होते.

## किंग कोहलीही झाला डीपफेकचा शिकार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एआयमुळे आपल्या दैनंदिन जीवनात अनेक महत्त्वपूर्ण बदल होत आहेत, पण त्याचा धोका जास्त आहे, ज्याची जगभरात चर्चा होत आहे. भारतात रश्मिका मानधना आणि माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांच्यानंतर आता विराट कोहलीही डीपफेक व्हिडिओंचा शिकार झाला आहे.

विराट कोहलीचा एक बनावट व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो एका बेटिंग ॲपची जाहिरात करताना दिसत आहे. सायबर गुन्हेगारांनी एक व्हिडिओ तयार करण्यासाठी एआय आधारित डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यामध्ये असे दिसते की, विराट कोहली त्या बेटिंग प्लॅटफॉर्मचा प्रचार करीत आहे. हा प्रमोशनल व्हिडिओ बनवण्यासाठी सायबर गुन्हेगारांनी एका हिंदी वाहिनीवर सुरू असलेल्या न्यूज शोचा भाग बनवला आहे.

व्हिडिओच्या सुरुवातीला हिंदी न्यूज चॅनलवरील अँकर बेटिंग प्लॅटफॉर्मबद्दल बोलू लागतो आणि त्यानंतर विराट कोहलीचा व्हिडिओ सुरू होतो. याचा अर्थ सायबर गुन्हेगारांनी विराट कोहली आणि न्यूज अँकर या दोघांचे डीपफेक व्हिडिओ तयार करून प्रमोशनल व्हिडिओ तयार केला आहे.

## उड्डाणपुलाखाली क्रीडा सुविधा पुरवण्यात येणार

### नवी मुंबई महापालिका देणार सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका क्षेत्रात गुणवंत खेळाडू घडावेत याकरीता खेळाची मैदाने विकसित करणे, अत्यावश्यक सेवा सुविधांवर भर देणे, प्राविण्यप्राप्त खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देणे तसेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे तंत्रशुध्द प्रशिक्षण देणे यावर भर देण्याचे नियोजन पालिकेने केले आहे.

से.१२ वाशी येथे इनडोअर स्टेडियम व बस स्थानक यांचे काम सुरू असून त्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा तरण तलाव उभारण्यात येत आहे. जून २०२४पर्यंत लोकार्पण करण्याचे नियोजन आहे. सानपाडा उड्डाणपुलाखाली पालिकेने ही सुविधा दिली आहे. यात बॅडमिंटन कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट, बॉक्स क्रिकेट पीच, रोलर स्केटिंग रिंग इ. अशा आवश्यकता लक्षात घेऊन बनविण्यात आलेल्या क्रीडा सुविधांप्रमाणे कोपरखैरणे, सेक्टर १ ए महापे ब्रीजखाली तसेच नेरुळ येथील एल ॲन्ड टी ब्रीजखाली नागरिकांकरिता क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. घणसोली क्रीडा संकुलाचा विकास करण्यात येणार आहे. घणसोली, सेक्टर १३ मधील भूखंड क्र. १ येथे क्रीडा संकुल विकसीत करण्याचे नियोजन असून पहिल्या टप्प्यामध्ये जागेचे सपाटीकरण करणे, कुंपण, प्रवेशद्वार, शौचालय बांधणे तसेच वृक्षारोपण करणे इ. कामे हाती घेण्यात येणार असून २८ एकरामध्ये विविध प्रकारचे क्रीडाप्रकार सुरू करण्याचे नियोजन आहे.

कुस्तीचे मैदान उभारण्यात येणार आहे. सानपाडा, सेक्टर ४ ए येथील मैदानात तसेच कोपरखैरणे, सेक्टर ४ ए येथील भूखंड क्रमांक १ वरील मैदानात कुस्ती आखाडा बांधण्याचे नियोजन सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये करण्यात आलेले आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com